अमृतानंदविरचित

# योगराज-टिळक

श्रीदत्तसांप्रदायिक ग्रंथ

संपादक
अनंत काकबा प्रियोळकर
डायरेक्टर, मराठी संशोधनमंडळ

★

प्रो. रामचंद्र दत्तात्रय रानडे
यांच्या पुरस्कारासह

म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. १३९३

REFBK-0009099
REFBK-0009099

मराठी संशोधनमंडळ
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाकुरद्वार, मुंबई २

१९५६

किंमत १। रुपया

अमृतानंदविरचित

# योगराज-टिळक

श्रीदत्तसांप्रदायिक ग्रंथ

संपादक

अनंत काकबा प्रियोळकर

डायरेक्टर, मराठी संशोधनमंडळ

★

प्रो. रामचंद्र दत्तात्रय रानडे

यांच्या पुरस्कारासह

मराठी संशोधनमंडळ

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाकुरद्वार, मुंबई २

१९५६

किंमत १। रुपया

REFBK-0009099

# आभार

आमच्या विनंतीस मान देऊन डॉ. रा. द. रानडे यांनीं या पुस्तकाला 'पुरस्कार' लिहून दिला, याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत ऋणी आहों.

अमृतानंदाचा योगराज-टिळक व रामदासतुकाराम यांचे ग्रंथ यांच्यामधील त्यांनीं जीं साम्यस्थळें दाखविलीं तीं विचारणीय आहेत; परंतु त्यांच्यावरून रामदासतुकारामांचे ग्रंथ अमृतानंदाच्या वाचण्यांत आले होते, असा मात्र निष्कर्ष काढतां येणार नाहीं.

योगराज-टिळक या ग्रंथाच्या पोर्तुगीज भाषांतराची टंकलिखित प्रत रोमहून फादर विकी (S. J.) यांनीं पाठविलेली आमच्यापुढें आहे. फादर विकी व प्रो. पिसुर्लेकर या दोघांचेंही प्रत्यक्ष पुराव्यावरून मत, हीं पोर्तुगीज भाषांतरें सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धात झालीं असें आहे. आम्हीं स्वतः गोव्याच्या सोळाव्या व सतराव्या शतकांतील इतिहासाचा तत्कालीन अस्सल कागदपत्रांवरून जो अभ्यास केला आहे, त्यांवरून रामदासतुकारामोत्तर काळांत अशाप्रकारचीं भाषांतरें तिकडे होण्याची शक्यताच मुळीं दिसत नाहीं. प्रो. रानडे म्हणतात त्याच्या उलट, म्हणजे अमृतानंदाचा ग्रंथ रामदासतुकारामांनीं वाचला असण्याचा मात्र संभव दिसतो.

१०–३–१९५६

अ. का. प्रियोळकर

# योगराज-टिळक

## (पुरस्कार)

श्री. अ. का. प्रियोळकर यांनीं संपादित केलेल्या अमृतानंदकृत 'योगराज-टिळक' या ग्रंथास प्रस्तावनेदाखल चार शब्द लिहिण्यास मला फार आनंद वाटतो. प्राचीन मराठी वाङ्मयाचा आस्थापूर्वक अभ्यास करणाऱ्या विद्वानांपैकीं श्री. प्रियोळकर हे प्रमुख असून, त्यांच्या विद्वत्तेस संशोधनाची जोड मिळालेली आहे. ते मूळचे गोवें प्रांतांतील असल्यामुळें युरोपियन मिशनरी मंडळींनीं मराठी भाषेची जी सेवा केली तिकडे त्यांचें लक्ष जाणें साहजिकच होतें. प्राचीन मराठी वाङ्मयाची ही शाखा किती संपन्न आहे, हें श्री. प्रियोळकर यांनीं आपल्या आतांपर्यंतच्या संशोधनानें दाखवून दिलेंच आहे. पण हें काम करीत असतांना आपल्या कवींनीं केलेल्या ग्रंथरचनेकडे त्यांनीं दुर्लक्ष केलेलें नाहीं ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. ते सध्यां करीत असलेल्या मुक्तेश्वरी भारताच्या संपादनाप्रमाणेंच प्रस्तुत काव्याचें संपादन हें त्यांच्या दुसऱ्या प्रकारच्या व्यासंगाचें फळ आहे.

'योगराजटिळक' हें काव्य दत्तसंप्रदायांतील अमृतानंद नांवाच्या कवीनें लिहिलेलें असून श्री. प्रियोळकर यांच्या मतें त्याचा रचनाकाल पंधराव्या शतकाचा उत्तरार्ध आहे. म्हणजे त्यांच्या दृष्टीनें हें काव्य एकनाथपूर्वकालीन ठरतें. आपल्या मतास पुरावा म्हणून त्यांनीं कांहीं ऐतिहासिक स्वरूपाचे उल्लेख सादर केलेले असून, ते महत्त्वाचे व विचारांत घेण्याजोगे आहेत. पण त्याबरोबरच या काव्यांतील भाषेवर अधूनमधून रामदासतुकारामांच्या भाषेचा थोडाफार परिणाम झालेला दिसून येतो, हेंहि लक्ष्यांत घेणें आवश्यक आहे. उदाहरणार्थ, "जालें जन्माचें फळ । पूर्वज उद्धरले सकळ ।" ही प्रस्तुत काव्यांतील ३२६ वी ओवी 'दासबोधां'तील अखेरच्या समासांतील "जालें साधनाचें फळ । संसार जाहला सफळ" या ओवीवरून सुचली असल्याचा फार संभव आहे. तसेंच परीस हा लोहाचें सोनें करतो, परंतु लोहाचा परिस तो करूं शकत नाहीं; म्हणून शिष्यास 'आपणासारिखे' करणाऱ्या सद्गुरूस परिसाची उपमा देतां येणार नाहीं, हा प्रस्तुत ग्रंथांतील विचारहि (ओ. २७) 'दासबोधां'तील विचाराशीं जुळणारा आहे. (दास. १–४–१५). जशी रामदासांच्या तशीच तुकारामांच्याहि भाषेची ओळख या काव्यांत कोठेंकोठें पटते. वेदमातेस हा कवि 'जुगादि जुनाटी' म्हणून संबोधितो (ओ. १३). तेव्हां वाचकास तुकारामानें वर्णिलेलें 'जुनाट जुगादीचें जाणें' सहजच आठवतें. सारांश, या कवीच्या वाचनांत दासबोध व तुकारामाची गाथा हे ग्रंथ आले असण्याचा संभव दिसतो व तसें असल्यास त्याचा काळ थोडा पुढें जाईल असें वाटतें. हा विषय संशोधनाचा आहे व त्याचा अधिक विचार संशोधकांनीं अवश्य करावा.

'योगराज टिळक' हें काव्य आध्यात्मिक स्वरूपाचें असून त्यांत योगाबरोबरच

भक्तीचाहि पुरस्कार केलेला आढळतो. भक्ति हा एक प्रकारचाच योगच असून त्यांत व योगाच्या रूढ कल्पनेंत विरोध असण्याचें खरोखर कांहीं कारण नाहीं. कारण भक्तिमार्गांत योगमार्गाचीं मूलभूत तत्त्वें समाविष्ट आहेतच. असो. प्रस्तुत काव्यांत वर्णिलेली 'शून्याची' महती साक्षात्कारमार्गाच्या दृष्टीनें विशेष महत्त्वाची असून ज्ञानेश्वरांच्या बिंदुल्याशीं या शून्याची तुलना करतां येण्याजोगी आहे. (ओ. ५० ते ५४).

याप्रमाणें हें काव्य आकारानें लहान असलें तरी गुणांनीं मोठें आहे. त्याचें संपादनहि प्रियोळकर यांनीं फार मेहनतीनें केलें आहे. या काव्याच्या एकूण तीन हस्तलिखित प्रती त्यांना अनुक्रमें धुळें, बडोदें व तंजावर येथें मिळाल्या व त्यांपैकीं धुळें-प्रत मुख्य धरून इतर दोन प्रतींतील पाठभेद त्यांनीं तळटीपांत दिले आहेत. त्यांचें हें संपादन पाठचिकित्साशास्त्रास पुष्कळ अंशीं धरून आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. या काव्याचें पोर्तुगीज भाषेंत भाषांतर झालें असल्याचा उल्लेख श्री. प्रियोळकर आपल्या 'प्रास्ताविकां'त करतात. खिस्ती धर्मप्रचारकांनासुद्धां या काव्याचें महत्त्व वाटावें व त्यांनीं त्याचा अनुवाद आपल्या भाषेंत करावा, ही एकच गोष्टहि या ग्रंथाचें महत्त्व सिद्ध करण्यास पुरेशी आहे. असो. अशा प्रकारचें दुर्मिळ व आध्यात्मिक काव्य परिश्रमपूर्वक प्रकाशित केल्याबद्दल श्री. प्रियोळकर हे अभिनंदनास पात्र आहेत.

निंबाळ (जि. विजापूर)
दि. ४ जानेवारी १९५६

रा. द. रानडे

अनुक्रम 22693 .... विः ऋवेद
क्रमांक 9303 .... नों: दि: ६।७।५६

# योगराज-टिळक

## ( प्रास्ताविक )

अमृतानंद या कवीनें लिहिलेला ' योगराजटिळक ' हा ग्रंथ अद्याप प्रकाशित झालेला नाहीं. हा ग्रंथ दत्तसांप्रदायाचा आहे, आणि एकेकाळीं तो फार लोकमान्य होता, असें दिसतें. या ग्रंथाकडे प्रथम आमचें लक्ष जाण्यास कारण झालें ते असें : रोम येथील झेवियरच्या चरित्रविषयक साधनांचे प्रसिद्ध संशोधक, फादर जे. व्हिकी यांना तिकडील जेजुइटांच्या दप्तरखान्यांत कांहीं संस्कृत व मराठी ग्रंथांचीं पोर्तुगीज भाषेंत झालेलीं भाषांतरें किंवा अनुवाद हस्तलिखित स्वरूपांत सांपडले. त्यांच्या इच्छेवरून पुणें येथील डि नोबिली कॉलेजांतील फादर स्टॅफनर यांनीं आम्हांस कांहीं शंका व माहिती विचारली. त्यामध्यें या ' योगराज–टिळका ' चा निर्देश होता. हा ग्रंथ अमुद्रित असल्यामुळें त्याच्या हस्तलिखिताचा आम्हीं शोध केला आणि समाधानाची गोष्ट ही कीं, त्याचें हस्तलिखित धुळ्याच्या श्रीसमर्थवाग्देवतामंदिरांत असल्याचें आढळलें. या संग्रहाच्या मुद्रित यादीमध्यें या हस्तलिखितासंबंधीं, " अमृतनंद योगेश्वरकृत योगराजटिळक पत्रें ३४, ओवीसंख्या ३४० प्रकाशनास सर्वथैव योग्य, " असा शेरा रा. देवांनीं दिला आहे. * तो पाहून हा ग्रंथ प्रसिद्ध करावा, असें आम्हांस वाटलें, आणि आमच्या विनंतीवरून या हस्तलिखिताची यथामूल नक्कल श्री. शिवाजीराव भावे यांनीं करून पाठवून दिली व तें काव्य प्रसिद्ध करण्यास रा. देवांची अनुमतिही मिळाली. पुढें फादर व्हिकी यांनीही आम्हांस रोममधील या ग्रंथाच्या पोर्तुगीज भाषांतराची टंकलिखित नक्कल पाठविली. या सर्वांचे आम्ही आभारी आहोंत.

मूळ मराठी काव्य आजच्या दृष्टीनें पाहातां बरेंच अशुद्ध व दुर्बोधही आहे. तरीपण तें आहे त्या स्वरूपांत जशाचें तसें मुद्रित करावें, असा आम्हीं विचार केला. कारण या काव्याच्या आणखी प्रती मिळतील, अशी आम्हांस आशा नव्हती. आपल्यापुढें मुद्रित स्वरूपांत जे जुने ग्रंथ येतात त्यांच्यावर संपादकीय संस्कार झालेला असतो. परंतु मूळ हस्तलिखितांत संहितेचें स्वरूप कसें असतें, याचाही एक नमुना लोकांपुढें ठेवावा, असाही आमचा एक उद्देश होता. त्याप्रमाणें हा ग्रंथ मराठी संशोधनपत्रिकेच्या एप्रिल १९५५ अंकापासून क्रमशः प्रसिद्ध करण्याकरितां आम्हीं छापखान्यांत पाठविला. पुढें हा मजकूर कंपोज झाल्यावर संशोधनार्थ बडोद्याला फिरतीवर गेलों असतां तिकडील

---

* शं. श्री. देव. **श्रीरामदासी संशोधन** ( खं. १ ), बाड २२४.

ओरिएंटल इंस्टिटयूटमध्यें आम्हांस या योगराजटिळकाचें दुसरें एक हस्तलिखित असल्याचें आढळलें. आणखी जास्त शोध करतां तंजावर येथील सरस्वतीमहालांतील संग्रहांतही तिसरें असल्याचें कळलें. त्यामुळें हें प्रकाशन स्थगित करून या दोनही हस्तलिखितांच्या नकला आम्हीं तिकडून आणविल्या.

कोणत्याही जुन्या ग्रंथाच्या एकापेक्षां जास्त हस्तलिखित प्रती सांपडल्या तर तें संपादितांना पाठचिकित्सेच्या दोन पद्धति असतात : ज्ञातृनिष्ठ ( subjective ) व ज्ञेयनिष्ठ ( objective ). ज्ञातृनिष्ठ पद्धतीप्रमाणें चिकित्सकाच्या बुद्धीस जो पाठ अस्सल वाटतो तो निश्चित ( re-constructed ) संहितेंत घालावयाचा व इतर पाठभेद तळटीपांत किंवा परिशिष्टांत द्यावयाचे. ज्ञेयनिष्ठ पद्धतीप्रमाणें कोणतीतरी एखादि हस्तलिखित प्रत प्रमाण मानावयाची व इतर प्रतींत आढळणारे पाठ तळटीपांत द्यावयाचे. या दोन्हीं पद्धतींमध्यें जसे गुण आहेत, तसेच अवगुणही आहेत; † परंतु आम्हांस पहिली जास्त पसंत असून आतांपर्यंत आम्हीं जें संपादन केलें तें याच पद्धतीला अनुसरून आहे; परंतु धुळेंप्रतीप्रमाणें एकदा कंपोज होऊन राहिलेला मजकूर सोडून टाकण्यापेक्षां तो शक्य तितका जशाचा तसा मुळांत घालून ब ( बडोदें ) व तं ( तंजावर ) यांतील पाठभेद उपरिनिर्दिष्ट दुसऱ्या ज्ञेयनिष्ठ पद्धतीप्रमाणें तळटीपांत देण्याचें आम्हीं ठरविलें. ते नमूद करतांना ऱ्हस्व दीर्घ किंवा अनुस्वार किंवा अगदींच अर्थहीन पाठांतरें विस्तारभयास्तव नमूद केलेलीं नाहींत. जास्त असलेला शब्द (+) अशा चिन्हानें व कमी शब्द (–) चिन्हानें दाखविलेला आहे. नष्ट किंवा अगदींच दुर्बोध अक्षरें किंवा मजकूर ×× अशा खुणांनीं निर्दिष्ट केला आहे. कांहीं अर्थहीनही पाठ शुद्ध पाठ ठरविण्यास उपयोगी पडतील म्हणून तळटीपांत दिलेले आढळतील. मूळ काव्य शक्य तितकें मूळ हस्तलिखिताला अनुसरून देण्याचा प्रयत्न केल्यामुळें ऱ्हस्व दीर्घ अनुस्वार वगैरेंचे दोष सुधारतां आलेले नाहींत. तरीपण आहे त्या स्थितींत वाचकांना सहज त्याचा बोध होईल अशी आशा आहे.

कवीचें नांव धुळें प्रतींत **अमृतनंद** असें आहे, पण ब व तं प्रतींमध्यें तें अमृतानंद असें आढळत असल्यामुळें तें बरोबर वाटतें. चांदोरकरांच्या 'महाराष्ट्र-कविकाव्यसूचींत' अमृतानंद कवीच्या या नांवावर 'स्वरूपनिर्णय' व 'योगराजतिलक' असे दोन ग्रंथ दिले आहेत; परंतु या दोनही ग्रंथांचे कर्ते वेगवेगळे असावेत, असें वाटतें. 'स्वरूपनिर्णय' या ग्रंथाच्या धुळ्याच्या श्रीसमर्थवाग्देवतामंदिरांत **अमृत** या नांवाखालीं दोन प्रती आहेत. ¶ एक पूर्ण व दुसरी अपूर्ण. या काव्याच्या केवळ

† जास्त माहितीकरितां आम्हीं संपादिलेल्या रघुनाथपंडितविरचित 'दमयंती-स्वयंवरा'च्या प्रतीला जोडलेला पाठचिकित्सेवरील निबंध पहा.

¶ **श्रीरामदासी संशोधन** ( द्वितीय खंड ), बाड १०७१ व १०७२.

९५ ओव्या आहेत. यांत कवीनें आपली गुरुपरंपरा दिली आहे ती अशी :— "उमापति—विष्णु—प्रजापति—वशिष्ट—पराशर—व्यास—शुकदेव—गौडपाद—शंकराचार्य—विश्वाचार्य—बोधघनाचार्य—ज्ञानघन—ज्ञानोत्तम—ज्ञानगिरि—सिंहगिरि—ईश्वरतीर्थ—नृसिंहतीर्थ—विद्यातीर्थसरस्वती—मलयानंदसरस्वती—कृष्णसरस्वती—नृसिंहसरस्वती—माधवेंद्र—**अमृतानंद**—गगनेंद्र—माधवसरस्वती—विठ्ठलसरस्वती—अंबिकासरस्वती—**अमृत.**"

स्वरूपनिर्णय या ग्रंथांत 'अमृत'बद्दल 'अमृतानंद' असाही एके ठिकाणीं निर्देश आहे* आणि त्यामुळें हे दोनही अमृतानंद एक असें धरून चांदोरकर, चालले असावेत, असें दिसतें. आमच्या मतें वरील गुरुपरंपरेंत नृसिंहसरस्वतीचा शिष्य जो माधवेंद्र त्याचा शिष्य जो अमृतानंद तोच 'योगराजतिलक' या ग्रंथाचा कर्ता असावा, व 'स्वरूपनिर्णयाचा' कर्ता 'अमृत' हा याच परंपरेंतील पुढील पुरुष स्पष्ट दिसतो.

'योगराजतिलक' हा गुरुशिष्यसंवादात्मक ग्रंथ आहे. ग्रंथाच्या आरंभीं ईश्वरप्रार्थना केल्यावर कवीनें गुरूला वंदन केलें आहे व त्याची थोरवीही गाईली आहे; परंतु यांत तो आपली गुरुपरंपरा देत नाहीं. तंजावरप्रतीमध्यें शेवटीं,

**गुरुशिष्याचा येकांतु । जो अनुवादला श्रीदत्तु ।**
**तें अमृतानंदु सांगतु । योगराजतिलकु ॥**

अशी ओवी आढळते. धुळें व बडोदें प्रतींतील ही ओवी नष्ट किंवा दुर्बोध झाली आहे. रोम येथें असलेल्या या ग्रंथाच्या पोर्तुगीज अनुवादामध्यें, "E este livro e o que nelle se contem compos o grande mestre Detatria e o declarou as seu desipollo Amrutanandu."—(हा ग्रंथ व त्यांतील मजकूर महदाचार्य दत्तात्रेय यानें रचिला असून तो त्यानें आपला शिष्य अमृतानंद याला कथन केला,) असें नमूद आहे. तसेंच या हस्तलिखिताच्या शेवटीं, "Recebeo Amrutanando a doutrina acima escrita do mestre Detatria com toda a boa vontade, que lhe ficou na memoria. Aqui se acaba o livro que se chama Ioguarasutilacu que e' pregasão que Detatria faz a seu disypolo Amrutanando." (वर लिहिलेल्या गुरु दत्तात्रेयाच्या तत्त्वज्ञानाचा मोठ्या हौसेनें अमृतानंदानें स्वीकार केला व तें त्याच्या स्मरणांत राहिलें. येथें अमृतानंदशिष्याला दत्तात्रेयानें केलेलें जें प्रवचन असा योगराजतिलक नांवाचा ग्रंथ संपतो.) असा मजकूर आहे.

या ग्रंथाचें खरें कर्तृत्व दत्तात्रेयाकडे असून अमृतानंद हा केवळ त्याचा 'लेखकु' किंवा 'पाठकु' अशी सोळाव्या शतकांत समजुत प्रचलित होती. त्यामुळें

* मूळ हस्तलिखित पाहून ही माहिती पाठविल्याबद्दल रा. गो. रा. गोगटे यांचे आम्हीं आभारी आहोंत.

या ग्रंथाला ‘ दत्तात्रेयाचा ग्रंथ ’ असें रूढींत नांव पडलें असें दिसतें. लुईस फ्रोइस नांवाच्या पाद्रीच्या ८–१२–१५६० तारखेच्या एका पत्रांत पाद्री फ्रांसिस्क रोइझ् ( Padre Francisco Roiz ) यानें कांहीं हिंदूंच्या धर्मग्रंथांची पोर्तुगीजींत भाषांतरें केल्याचा निर्देश आहे, त्यांत ‘ दत्तात्रयाच्या ग्रंथाचा ’ अन्तर्भाव आहे, असें प्रो. पिसुर्लेंकर लिहितात. तसेंच, येव्हर ( पोर्तुगाल ) येथील ग्रंथसंग्रहालयांत एक हस्तलिखित आहे ( Codice $\frac{\text{CXV}}{2\text{–}7}$) त्यांत हा ‘दत्तात्रेयाचा ग्रंथ’ सेंट पॉल कॉलेजच्या रेक्टरजवळ आहे, असें स्पष्ट नमूद असून ह्या हस्तलिखिताचें अक्षर सोळाव्या शतकाच्या अखेरीचें आहे, असेंही त्यांनीं ता. १२–६–५५ च्या पत्रांत आम्हांस कळविलें आहे.

रोममधील, योगराजटिळकाच्या ह्या पोर्तुगीज भाषांतराचा कर्ता फ्रान्सिस्क रॉइझ् हा युरोपियन कीं एकादा बाटलेला ब्राह्मण हें कळण्यास मार्ग नाहीं. कारण हिंदूंच्या क्रिस्तीकरण्याच्या वेळीं बातिस्मा देतांना धर्मपित्याचें ( God-father ) क्रिस्ती नांव अशा नवक्रिश्चनास मिळे. मौज ही कीं, एकाच घरांतील माणसाचें किंवा सख्ख्या बंधूंचे बातिस्म्याचे वेळीं वेगळे धर्मपिते असले म्हणजे त्यांना भिन्न आडनांवें मिळत. ‘ सासष्टींतील पहिले क्रिस्ती ’ नांवाच्या एका निबंधांत आमांसियु ग्रासियस् या गोमंतकीय विद्वानानें यासंबंधीं पुष्कळ माहिती पुढें आणिली आहे. त्यांत सोळाव्या शतकाच्या अखेरीस किंवा सतराव्या शतकाच्या आरंभीं असलेल्या नवक्रिश्चनांचीं नांवें नमुद आहेत. त्यांत “ लोकु सिनाय ( लक्ष्मण शेणवी ) याचा मुलगा Po. Roiz ” किंवा “ सांतप्पा पैचा मुलगा Go. Roiz ” असे नामानिर्देश आढळतात. ( सुप्रसिद्ध मराठी क्रिस्तपुराणाचा कर्ता तोमास स्टिफन्स हा धर्मपिता झाल्यामुळें त्याचें नांव एका विठु पैच्या मुलाला मिळालें होतें. ) त्यावरून योगराजटिळकाचें पोर्तुगीज भाषांतर करणारा Francisco Roiz हा बाटलेला ब्राह्मण असणें अशक्य वाटत नाहीं. मानुएल द ओलिव्हर नांवाचा एक विद्वान क्रिस्ती ब्राह्मण अशीं भाषांतरें करणारा १५५९ मध्यें प्रसिद्ध होता. कसेंही असलें तरी ‘ योगराजटिळक ’ हा ग्रंथ त्याकाळीं फार लोकप्रिय होता असें स्पष्ट दिसतें. या ग्रंथाच्या पोर्तुगीज भाषांतराच्या सुरुवातीलाच,

“ Segue-se o livro chamado Hiogarasotila (cu) em que os jentios tem muita estimá e veneraçáo porque dizem que nelle esta todo o saber e ciencia da salvaçáo das almas.” ( पुढें योगराजतिलक नांवाचा ग्रंथ सुरू होत आहे. याचें हिंदुलोक फार कौतुक व आदर करतात. कारण आत्म्याच्या तारणासंबंधींचें सर्व ज्ञान व शास्त्र त्यांत अन्तर्भूत आहे, असें त्यांचें म्हणणें आहे. ) असें भाषांतरकारांनीं नमूद केलें आहे.

---

J. B. Amancio Gracias. *Primeiros Christãos em Salsete.* 1934. pp. 24, 28.

गोवा बेटामध्यें १५४० सालीं हिंदूंच्या छळास सुरुवात झाली व सासष्ट व बार्देस येथें हा धूमाकूळ पुढें १५५५ च्या सुमारास सुरू झाला. १५६० सालीं गोव्यामध्यें स्थापन झालेल्या इंक्विझिशनच्या कायद्याप्रमाणें हिंदुधर्माचेच नव्हे तर कॅथलिक पंथाखेरीज इतर क्रिस्ती पंथांचेही धर्मग्रंथ जवळ बाळगणें हा गुन्हा होता. इंक्विझिशनच्या दंडस्मृतीमध्यें ज्यांच्याविरुद्ध खटले भरावेत, अशा गुन्हेगारांची यादी दिली आहे त्यांत "Contra os que tem e lem livros defesos" (जे आक्षित ग्रंथ जवळ बाळगतात व वाचतात अशांविरुद्ध) असें स्पष्ट नमूद आहे.‡ इंक्विझिशनच्या स्थापनेपूर्वीही हिंदुधर्मग्रंथ जवळ बाळगिणें गुन्हा ठरला होता. प्रो. पिसुर्लेंकर यांनीं २६-१२-१५५८ रोजीं एका जेजुईटानें लिहिलेलें पत्र प्रसिद्ध केलें आहे त्यांत "एका हिंदूच्या घरांत 'अनादिपुराण' नामक शंभराहून अधिक पृष्ठांचा एक ग्रंथ मिळाला त्याचाही अनुवाद पोर्तुगीजमध्यें करण्यांत आला. ज्याच्याकडे हा ग्रंथ होता त्याला कैद करून चार महिन्यांची शिक्षा दिली आहे, *" असा मजकूर आढळतो. यावरून १५६० नंतर नवा हिंदुग्रंथ गोव्यांत येणें शक्य नव्हतें व 'योगराजतिलका' चा रचनाकाळ याच्यापुढें जाणार हें उघड दिसून येणारें आहे. तो किती मागें नेतां येईल तें आतां पाहूं :

दत्त या देवतेचा उगम केव्हां झाला व कसा झाला यासंबंधीं एकवाक्यता नाहीं. परंतु महाराष्ट्रांत दत्तोपासना फार जुन्या काळापासून प्रचलित आहे. महानुभाव पंथाचे संस्थापक श्री चक्रधर याच्या पूर्वीही ती अस्तित्वांत होती. "श्री चक्रधर हा हिंडत हिंडत कोणे एके वेळीं प्रत्यस्थानीं भोगावतीचे कांठीं आला व तेथें त्यास श्रीदत्तात्रेयाचें दर्शन घडलें आणि याच ठिकाणीं त्यानें यावेळीं म्हणजे ११८५ कार्तिक महिन्यांत गुरु सिंह राशीस असतां संन्यास दीक्षा धारण केली," असें भावे लिहितात.† यासंबंधीं लीळाचरित्रांमध्येंही आरंभींच पुढीलप्रमाणें उल्लेख आढळतो :—

"मातापुरा बीजें केलें. तेथ देवगीरीवरि बीजें करितां : श्रीदत्तात्रेयप्रभु : व्याघ्राचा वेखु धरुनि जाळि तळुनि बीजें केलें : हाक दीधली : श्री मुगुटीं चवडा ठेविला : तेथ शक्ति स्वीकारली. अवतारु स्वीकरीला." §

दत्तोपासनेचा उगम असा जरी फार जुना असला, तरी तिला जास्त उठाव श्री नृसिंहसरस्वति या महापुरुषाच्या अवतारापासून मिळाला. श्रीपाद श्रीवल्लभ व नृसिंहसरस्वति हे श्रीदत्तात्रेयाचेच अवतार मानतात. नृसिंहसरस्वति शके १३८० मध्यें

---

‡ *Regimento de Inquisição*, § 12, 1640.

* **भारतमित्र, गोवा.** जानेवारी १९५३.

† ल. वि. भावे. **महाराष्ट्र-सारस्वत**, भा. १(आ. ३)श. १८४६. पृ. ५९.

§ **लीळाचरित्र**, भाग १ला. एकांक-सं. ह. ना. नेने. श. १८५८. पृ. १.

ब्रह्मीभूत झाले असें भावे ' गुरुचरित्र ' या ग्रंथाच्या आधारें ठरवितात.‡ गुरुचरित्र या ग्रंथांत सरस्वती-गंगाधर यानें नृसिंहसरस्वतींचें चरित्र विस्तारानें वर्णन केलेलें आहे.

स्वरूपनिर्णय या अमृतकृत ग्रंथांतील उपरिनिर्दिष्ट गुरुपरंपरेमध्यें नृसिंहसरस्वतीचा शिष्य म्हणून माधवेंद्राचा नामनिर्देश आहे. याचा शिष्य म्हणून ज्या अमृतानंदाचा या गुरुपरंपरेंत उल्लेख आहे तोच ' योगराजतिलका ' चा कर्ता असावा. भावे यांनीं दिलेला नृसिंहसरस्वतीचा निर्याणकाल जरी कदाचित् बिनचूक नसला तरीपण सामान्यतः इ. स. पंधराव्या शतकाच्या मध्यांत तो असला पाहिजे. माधवेंद्र व त्याचा शिष्य ' योगराजटिळका ' चा कर्ता **अमृतानंद** यांचा काल या शतकाचा उत्तरार्ध धरावयास हरकत नाहीं. गोव्यांत धर्मच्छळ सुरू होण्याच्या अगोदर म्हणजे १५४० सालापूर्वी हा ग्रंथ गोमंतकांत गेला असावा व १५५९ च्या सुमारास त्याचें पोर्तुगीजींत अनुवाद किंवा भाषांतर झालें असावें. या काव्याच्या धुळे प्रतींत तीनशें तीस ओव्या आहेत आणि रोम येथील पोर्तुगीज अनुवादांत त्या तितक्याच ("trezemtos e trinta versos") असल्यानें शेवटीं नमूद आहे.

या ' दत्तात्रयाच्या ग्रंथा ' कडे विदेशी क्रिस्ती लोकांचें विशेष लक्ष वेधण्याचें कारण असें दिसतें कीं, त्यांतील तत्त्वज्ञान त्यांच्या एकेश्वरी मताला बरेंचसें जुळणारें आहे, असें त्यांना वाटलें असावें. यांतील परब्रह्म, जगदुत्पत्ति, देवत्रय (Trinity) या कल्पना त्यांच्या परिचयाच्या व धर्मभावनेला मानवणाऱ्या होत्या; म्हणूनच या ग्रंथांतील तत्त्वज्ञानाला हिंदु लोक अनुसरत नाहींत, याबद्दल या ग्रंथाच्या पोर्तुगीज अनुवादकानें शेवटीं तक्रार केली आहे ! तो म्हणतोः " या ग्रंथासंबंधीं व त्यांतील तत्त्वज्ञानासंबंधीं जरी हिंदु लोकांना आदर असला तरीपण त्याचा ते फायदा घेत नाहींत. यांतील तत्त्वज्ञान फार अवघड (aspera) आहे असें ते म्हणतात, आणि पुष्कळ ब्राह्मण आपल्या स्वतःच्या स्वार्थाकरितां दुसऱ्या ग्रंथांकडे व त्यांतील स्वच्छंदी (largas) धर्माचारांकडे त्यांना वळविण्याचा प्रयत्न करितात. अशाप्रकारें त्यांची फसवणूक चालली आहे. कारण या (योगराजटिळक) ग्रंथापेक्षां ते इतर धर्ममतांच्याच मागें विशेष आहेत. ज्ञानेश्वर व एकनाथ यांच्या दरम्यान जो मराठी ग्रंथरचनेंत कांहीं काळ खंड पडलेला दिसतो तो प्रस्तुत काव्यासारख्या आणखी ग्रंथांच्या प्रकाशनानें भरून येईल.

‡ **महाराष्ट्र-सारस्वत**, भा. २. पृ. २१९.

# योगराजटिळक

## ( श्रीअमृतानंदकृत )

### श्रीगणाधिपतयनमा*

जयजया मुळ आधारउपविष्टा[1] । जयां[2] आरंभि[3] प्रतिष्टा[4] ।
जया सकळगुणद्रिष्टा[5] । चतुर्दळिं ॥ १ ॥

जय चतुर्वेदनायका[1] । चतुर्वर्णचतुर्मुखा ।
बाळा[2] दिर्घनासिका । चीतामणि ॥ २ ॥

जया चतुर्वेदसारा । जया ज्ञानजोतिदिनकरा ।
जया सकळशाश्रा[1] आगोचरा[2] । यकदंता[3] ॥ ३ ॥

तुं सकळयोगसिधिचा[1] दाता । तुं[2] सकळविघ्ननीवारिता[3] ।
तुं[4] शुधबुध[5] सर्वथा[6] । जगदाधारा[7] ॥ ४ ॥

---

*श्रीसरस्वतीये नमः ॥ श्रीगुरुभ्योनमः ॥ श्रीदत्तात्रीयाये नमः ॥
श्रीगुरुचरणा नमस्तु ते ॥
अचीताये वेक्तरूपाये ॥ निर्गुणाये गुणात्मने
समस्त जगदाधारा मूर्त्तये ब्रह्मणे नमः ॥ १ ॥
ब्रीदेन ब्रीदमात्तेन तांब्रभेदादीकांचनः ॥
सद्गुरुप्रसादेन मोक्ष मुक्ती क्षणी ॥ २ ॥

असा तं मध्यें आरंभीं जास्त मजकूर आहे. व मध्यें पांचव्या ओवीमधील जोडेच्या पूर्वींचा सर्व मजकूर गहाळ.

१. १ आधारा उप० तं; २–४ सकळगुणवरिष्ठा तं; ५ आरंभी प्रतिष्ठा तं.

२. १ चतुर्दळीनायका तं; २ बाळार्क तं.

३. १–२ ०शास्त्रं विस्तारा तं; ३ येकदंता तूं तं.

४. १ सकळसिध्धीचा तं; २–३ आवघी विघ्नें निवारिता तं; ४–६ सुधी बुधी निभ्रांता तं; ७ (+) मूर्ती तं;

तुझें ज्ञान जया जोडे । तया निश्चित ब्रह्म आंतुडे ।
श्रीगुरुप्रसादें घडे । ध्यान तुझें ॥ ५ ॥

तुझे कृपेचि न्‍हाळि । करि आज्ञानासि रवदोळि[1] ।
अद्वैत[2] अहंभावाची होळी[3] । करिसि[4] नीमीशमात्रें ॥ ६ ॥

जेथें तुझि कृपादृष्टि । तेथें कैंची वीघ्नासि[1] उठि[2] ।
प्रपंचासि देसि[3] मीठि[4] । क्षीणामाजी[5] ॥ ७ ॥

तुं सुन्यबीज साहाकारु[1] । तु[2] नीराकारि[3] आकारु ।
तुं[4] निळारंभी[5] अंकुरु । ब्रह्मविदेचा ॥ ८ ॥

तुं ब्रह्मवीदेचा रांधा । सुन[1] संकेताचा बांधा ।
तुं शिवशक्तिचा सांधा । सिध सहज ॥ ९ ॥

अैसि अैकोनि उत्तरें । काय बोलिले वीघ्नहर[1] ।
मग ह्मणे पुरे रे पुरे । त्रुप्त[2] जालो ॥ १० ॥

आरे तुझिया आदरा । प्रसन्न[1] जालों रे चतुरा ।
आता स्तविं पा सुंदरा । ब्रह्मकुमरि[2] ॥ ११ ॥

आरे वोळखोनि तुझे मन । मिं पुर्वीत[1] असें[2] ज्ञान[3] ।
आतां करि पां स्तवन । भवान्नीचे ॥ १२ ॥

---

६. १ रवंदली ब तं; २ द्वैत ब तं; ३ ×× तं; ४ करी ब, (–) तं.

७. १–२ आवि ×× ब, अविद्या उठी तं; ३ देति ब, होये तं; ४ तुटी तं; ५ ततक्षणीं ब तं.

८. १ साकारु ब तं; २–३ निराकारासी तं; ४–५ तुंचिफल विं ब.

९. १ शून्य ब तं. ब तं मध्यें दुसऱ्या व तिसऱ्या चरणांची अदलाबदल आहे.

१०. १ °हरें ब; २ तुज मी प्रसन्न तं.

११. १ मी प्रसन्न ब तं; २ ब्रह्मतनया ब तं.

१२. १–३ पूर्वींच असें प्रसन्न ब तं.

जये वहन हंसपुष्टि । उपविष्ट द्विपुष्टि[1] ।
ते जुगादि[2] जुनटि[3] । वेदमाता[4] ॥ १३ ॥

जे[1] सर्व[2] सुखाची साउलि । जे सकळ देवद्विजाची[3] माउली ।
जियपासाव रचलि[4] । श्रृष्टिरचना ॥ १४ ॥

सप्तपाताळ अखंडा[1] । सप्तद्विपावति नवखंडा[2] ।
छेपनकोटि[3] ब्रंह्माडा[4] । जयपासुनि[5] ॥ १५ ॥

अैसि ते अगोचर[1] । वेदांसि न कळे पार ।
उत्पतिप्रळय नीरंतर । जीयमाजि ॥ १६ ॥

ते गगनगंगा[1] उर्धवाहिनी[2] । जे[3] मध्यस्वर्गमंदाकीनी[4] ।
जे[5] ब्रह्मरंध्रनीवासिनी[6] । तयसि नमन माझें ॥ १७ ॥

जे दशमद्वारनीवासिनी[1] । कमळकळिकाडांकिणि[2] ।
पश्चमपंथगमनि[3] । शाभवा[4] ते[5] ॥ १८ ॥

---

१३. १ द्विपुटीं तं; २ योगादि ब; ३ × न्नटी ब, जुदन्हाटी तं; ४ वेदगर्भा ब, वेदगर्भ तं.

१४. १ ति ब, (–) तं; २ सहज तं; ३ देवांची ब, ब्रीदेची तं; ४ उपजली ब, जाली तं.

१५. १ अखंड ब तं; २ नवखंड ब तं; ३ सप्त ×× ब, सप्त स्वर्गे तं; ४ ब्रह्मांड ब तं; ५ जयेचि करणी ब तं.

१६. १ अनंत अमर ब तं.

१७. १ गंगा तं; २ उर्ध्ववाहिनी तं; ३–४ मध्ये श्रीमंदा° ब, मध्यें वाहे श्रीमंदा° तं; ५ (–) ब तं; ६ ब्रह्मसूत्रनिवा° ब, ब्रह्मरंध्रे निवा° तं.

१८. १ दशद्वार° तं, ×× ब; २ °डालिणि ब; ३ वायुसुत्रशंखिणी ब, वायोसूत्रसंकीनी तं; ४–५ अमरवेली ब तं.

यापुढें, जे त्रिकुट शिखरत्रिवेणी । पश्चमपंथे गमनी ।
मासोपवास तपस्विनी । शांभवी ते ॥ १८ अ ॥

अशी ओवी तं मध्यें आहे. ब मध्यें ही ओवी होती, पण तिचा कांहीं भाग नष्ट झाला आहे.

सिवसंत्ति[1] विशमसंधि । अकुळ कमळणि जाळंद्रि[2] ।
ब्रंह्मग्रंथि[3] कमळसंधि[4] । सुन्यसुत्र[5] ॥ १९ ॥

ते[1] त्रीपुरभैरवी भद्रकाळि । चंडमुंडा कंकाळी[2] ।
सुसप्ततारांगणि[3] महितळी । वागेश्वरि ॥ २० ॥

अैसि अैकोनी वीनति । थोर संतोशलि त्रीजेगति ।
मग ह्मणे[1] जालो[2] त्रुप्ती[3] । कीर्ति[4] करिसि[5] प्रगट[6] ॥ २१ ॥

तव[1] सरस्वति म्हणे रे बाळा । घेइ अंमृताचा गळाळा ।
मग बोल[2] पां[3] प्रबळा[4] । परमार्थसुख ॥ २२ ॥

आतां[1] वंदु[2] श्रीगुरुनाथ[3] । जेणे मस्तकी ठेविला हस्त[4] ।
संशयो[5] फेडुनि[6] नीभ्रांत[7] । केलो[8] ज्याणे[9] ॥ २३ ॥

तो[1] श्रीगुरु ह्मणिजे कवणु । नीराकारि[2] आकारला नारायण ।
अवतरला[3] सिशा[4] लागुन[5] । आदिपुरुष[6] ॥ २४ ॥

या[1] चंदनाची प्रौढि पाहि । वारा वाहे जीयवाहिं ।
तीकडिल वृक्ष[2] तेहि[3] । करि आपणासारिखे ॥ २५ ॥

---

१९. १ **जे शिवभक्ति** ब तं; २ **जालांध्री** ब तं; ३–४ **ब्रह्मग्रथीका संधी** तं; ५ **तंत्रिसूत्र** ब, **शून्यमात्रें** तं.

२०. १ (–) ब तं; २ **खंकाळी** तं; ३ **सुषुप्तितरंगणी** ब, **सुहंसप्ततारां°** तं.

२१. १–३ **पुरे पुरे आतां किती** ब तं; ४–६ **करिसील प्रकट** ब, **प्रकट करिसी** तं.

२२. १ **मग** ब तं; २–४ **बोलसी ते बोल प्रेमला** ब, **बोलसी ते निर्मळ** तं.

२३. १–३ × × तं; ४ **हायु** ब; ५–७ **संसारतोडणी निश्चितु** तं; ८–९ **केले जेणें** ब तं.

२४. १ (–) ब तं; २ **जो निरा°** तं; ३–५ **आपणासारिखें करुनु** ब तं; ६ **ठेविलें मज** ब तं.

२५. १ (–) तं; २–३ **तरु सकळही** तं; ३ **समस्तही** ब.

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 22693 वि: ...
क्रमांक 9303 नों दि: ...



परिसाची महिमा थोरि । तो लोहाच सोने करि ।
परि न करवे आपणासरि । परिस असा ॥ २६ ॥

म्हणोनी परिसाचि महिमा सानी[1] । गुरुची[2] कृपा[3] गहन ।
सीश्यासि आपलें[4] पद[5] देउन[6] । श्रीष्ट[7] केलें[8] ॥ २७ ॥

गुरुस[1] सिश्य[2] भेटला । चरणावरि माथा ठेविला ।
तव येरें[3] प्रेमें[4] आळंगिला । हृदयसि[5] ॥ २८ ॥

प्रकाश प्रेम[1] जोति । परब्रह्म अवतरले क्षिति ।
गुरुकृपा[3] होयं[4] नीगुति[5] । तरिंच[6] सिधि[7] ॥ २९ ॥

आहो जि श्रीगुरुनाथा । तुं अकलिपत[1] दाता ।
तुं निर्गण निःप्रपंच सर्वथा । निरंतरा[2] ॥ ३० ॥

तुं अकलिपत[1] अभीन्न । अमर अवीनाश नीरंजन ।
विस्वा[2] तारिता[3] आपण[4] । प्रकासितु[5] ॥ ३१ ॥

---

२६. ही ओवी तं मध्यें **परिसीं लोहो स्पर्शे । तें सुवर्णचि होय कैसें ।**
**कनक लागलें परिसें । पुनरपि तेंचि होये ॥**

आणि ब मध्यें

**आणि परीसीं लोहो स्पर्शे । ते शुद्धम होय कैसें ।**

**त्या सुवर्णा आन लोहो लागलियां तैसें । न करी कनका ॥** अशी आहे.

२७. १ **सान** ब तं; २ **त्याहुनि सद्गुरु** तं; २–३ **गुरुकृपा त्याहूनि** ब; ४–६ **लाधलें गुरुपण** ब तं; ७–८ **कृपादृष्टी** ब तं.

२८. १–२ **गुरु शिष्यासि** ब; ३–४ **येरें येरु** ब तं; ५ **हृदयमानसि** ब, **हृदयासि** तं.

२९. १–२ **आणि परंज्योती** तं, ×× ब; ३–५ **ते गुरुरूप निवृत्ति** ब, **ते गुरुरूपे निउर्ती** तं; ६–७ **दृश्य जाहाले** ब, **सादृश्य जाहालें** तं.

३०. १ **आकाल्य** ब, **अलिप्तु** तं; २ **निरंतरु** ब तं.

ब तं मध्यें दोन व तीन चरणांची अदलाबदल आहे.

३१. १ **आकल अनंतु** ब, **अनंतु आकलु** तं; २–३ **विश्वा–जितु** ब, **अविद्यातीतु** तं; ४ **आपआपणु** ब तं; ५ **प्रकाशकु** ब तं.

ह्मणउनि ऐसिया श्रीगुरुनाथा । उपमा नांहिं सर्वथा ।
निराकार आकारला निभ्रांता । श्रीगुरुकृपे[1] ॥ ३२ ॥
इतुकियानि[1] श्रीगुरुनाथें । शिषु वारिला[2] परहस्तें[3] ।
ह्मणे पुरे पुरे विस्तारवाक्तें[4] । काय काज ॥ ३३ ॥
श्रीगुरु ह्मणे अमृत्तनंदा[1] । तुं बोलीलास आत्मविनोदा ।
तेंची जाहालें सहजसिधा[2] । ब्रह्मज्ञान[3] ॥ ३४ ॥
नमो[1] जी श्रीगुरुनाथा । तुं अकल्पित दाता ।
ज्ञानकथन[2] आतां[3] । निरोपिजो जि ॥ ३५ ॥
हां जी[1] संसारसागरू । महा[2] दिसत[3] दुरंधरु[4] ।
कैसेनि उतरिजे पैलपारु । सांगा[5] स्वामि ॥ ३६ ॥
अरे सुन्य[1] ते वोळखावे । सुन्य[2] तेची[3] ध्यावें ।
सुन्यरुप[4] होवें[5] । सहजसुखिया ॥ ३७ ॥
देवतापुजन केलीयां । तिर्थी दान दिधलीयां ।
जे पुण्यलाभ[1] केलियां । गयावर्धन[2] ॥ ३८ ॥
कन्यादान केलिया । भुमिदान[1] दिधलियां ।
गोदान[2] समर्पिलियां[3] । जें[4] पुण्य[5] घडे[6] ॥ ३९ ॥

---

३२. १ गुरुरूप ब, गुरुस्वरूपें तं.

३३. १ यावरी तं, ×× ब; २ वारिता तं; ३ संकेत ब, संकेतें तं; ४ विस्तारें बहुत ब, विस्तारें बहुतें तं.

३४. १ आमृतनंदा ब, अमृतानंदा तं; २ प्रसिद्धा तं; ३ सोहंसुख तं.

३५. १ वों नमो तं; २ तरी ज्ञान कथिन ब; २–३ तरी ज्ञानकथा तं; ४ (–) तं.

३६. १ (–) हा ब तं; २–३ पाहातां महा तं; ३–४ दुष्ट घोरंधरू ब; ५ तें सांगा ब तं.

३७. १ शून्य ब तं; २–३ शुन्यमय ब, आणि शून्यमय तं; ४ शून्यरूपें ब; ५ होआवें ब, देखावें तं.

३८. १ पुण्य तं; २ गयावर्जनीं ब तं.

३९. १ गौदान ब; २–३ तुळापुरुष केलीयां ब, भूमिदान दिधलियां तं; ४–६ जें घडे पुण्य ब तं.

रत्नदान[1] दिधलियां । तुळापुरुषि[2] बैसिलियां[3] ।
आन[4] उदक[5] दिधलियां । काय[6] पुण्य[7] घडे[8] ॥ ४० ॥
अरे हे पुण्य साने । यासि मागुत्ते[1] फळ भोगणें ।
परि जन्ममरणावेगळें[2] होणे[3] । यकात्मज्ञाने[4] ॥ ४१ ॥
आरे आत्मज्ञाना[1] समान । नाहि[2] दुसरे पुण्य ।
ध्यान धारणा[3] अनुष्ठान । सरि न पवे ॥ ४२ ॥
ते[1] अभेद[2] अद्वैत[3] । अमुर्ति[4] आकळ[5] अनंत ।
तेंची वोळखें नीभ्रांत[6] । परब्रह्म ॥ ४३ ॥
तव सिश्य ह्मणे स्वामि[1] । बरवि[2] आज्ञा दिधली तुह्मि ।
परि[3] अनुभवेंवीण परब्रह्मि[4] । वोळखि कैंचि ॥ ४४ ॥
जइं[1] आकाश ना आंत्राळ । धरणि[2] ना पाताळ ।
वायो[3] ना जळ । तैं ब्रह्म केवळ[4] कवण[5] म्हणावें[6] ॥ ४५ ॥
जै[1] ब्रह्मा ना विष्णु । रुद्र नव्हता आपणु ।
तै ब्रह्म असे[2] कवणु । कोठें होतें ॥ ४६ ॥

---

४०. १ गौदानें ब, नाना रत्नें तं; २–३ रत्नें विवीध्दे दान केलियां ब, तुळापुरुष केलियां तं; ४–५ श्रेष्ठ अन्नदान ब, इच्छाभोजनें तं; ६–८ जे घडे पुण्य ब.

४१. १ मागुतें ब तं; २–३ जन्ममरण चुके जेणें तं; ४ येक आत्मज्ञानें ब तं.

४२. १ ब्रह्मज्ञाना ब तं; २ आनु नाहीं तं; ३ धारणजप ब, जपतप तं.

४३. १–३ अलक्ष आद्वैत आमूर्त्त ब, अलक्ष अमृत अद्वैत तं; ४ आकुल ब, अकळ तं; ५ अमूल ब तं; ६ रे निश्चीत ब, गा निश्चित तं.

४४. १ जी स्वामी ब, गुरुस्वामी तं; २ (–) ब तं; ३ (–) ब, तरी तं; ४ ब्रह्मीं ब.

४५. १ हां जी ब तं; २ नाहीं धरणी तं; ३ नसे वायो तं; ४–६ तें कवण कोठें होतें ब, तें कवण तं.

४६. १ जैं ब, नाहीं तं; २ तें ब तं.

न्हते[1] चंद्र सूर्य दोन्हि । न्हता[2] दिन ना रैणि[3] ।
तैं[4] ब्रह्मातं[5] कवणि[6] । वस्तु[7] होति[8] ॥ ४७ ॥

देव धर्म न्हत्ता[1] । गुरु सिश्य न्हता ।
तै ब्रह्म यैसें[2] कवणु[3] नीश्चीता[4] । कवणु होते[5] ॥ ४८ ॥

जैं रवि शशी नाहिं । स्वर्ग मृत्य पाताळ कांहिं ।
तैं ब्रह्म कवणे[1] ठांइं[2] । काय[3] होतें[4] ॥ ४९ ॥

तव[1] श्रीगुरु[2] म्हणे[3] रे[4] कुमरा[5] । हे[6] सकळ शुन्याचा वीकारा[7] ।
शुन्यापासाव विस्तारा[8] । हे[9] चराचर[10] जालें[11] ॥ ५० ॥

सुन्य तेची साकार । शुन्य श्वयभ[1] नीरंतर ।
सुन्यापासाव अंकुर[2] । देवत्रय[3] ॥ ५१ ॥

सुन्य सहज[1] वीकासलें । तेथें तेज्योन्मय होउनी[2] ठेलें[3] ।
ते तेजीं समावलें[4] । तिन्ही देवा[5] ॥ ५२ ॥

सुन्य तेची सहज आपण । श्वयभ नीर्मळ निर्गुण ।
केवळ आपआपण[1] । प्रकाशकु ॥ ५३ ॥

---

४७. १ **नाहीं** ब तं; २ **नाहीं** तं; ३ **रजनीं** ब तं; ४–६ **ते ब्रह्म ह्मणीजे वस्तु कवण** ब; ५–६ **ब्रह्म कवण्या स्थानीं** तं; ७–८ **कोठें होतें** ब, **काय होतें** तं.

४८. १ **नसता** ब तं; २–४ **निभ्रांता** तं; ३–४ **निश्चींत होता** ब; ५ **नाम** ब, **नांवें** तं.

४९. १-२ **यैसें पांहीं** तं; ३–४ **कवण नांवें** तं.

५०. १ (–) ब; १–५ **मग बोलीले श्रीगुरु** तं; ६ **हा** तं, ७ **आकारू** तं; ८ **विस्तारू** तं; ९–११ **चराचर हें** ब तं.

५१. १ **स्वयं, स्वयंभीं** तं; २ **आकार** तं; ३ **देवत्रयें** तं.

५२. १ **मय** तं; २–३ **प्रकाशलें** ब तं; ४ **संभवले** ब तं; ५ **देव** ब तं;

५३. १ **कैवल्य कारण** ब.

नीराकार नीराधार । नीर्भय[1] नीरंजन[2] निरंतर ।
सोहं सर्वत्र[3] साहाकारु । परब्रह्म जें[4] ॥ ५४ ॥
तया सहजची[1] अंकुरु । त्रीमुर्ति लिंगाकारु ।
इछापासाव[2] विस्तारु । पिंडब्रम्हांड हें ॥ ५५ ॥
इछापासाव[1] त्रीआक्षरिं । अकारउकारमकारिं ।
तेची त्रींपदा[2] गायत्री । वेदमाता ॥ ५६ ॥
ते गायत्रीपासाव[1] जाण[2] । जाहालें ब्रह्मयासि उत्पन[3] ।
वीष्णु रुद्र आपण । जेन्मले[4] तेथें[5] ॥ ५७ ॥
तेची[1] परब्रह्मीचे[2] तरंग । चंद्रसुर्य उभय जग[3] ।
पाताळ मृत्यु[4] स्वर्ग । ब्रह्मांडरचना ॥ ५८ ॥
जी हे जी पृथीवी । आप तेज कांहिं ।
वायु आकाश का नांहि । तैं सहज कवणे ठाइं ॥ ५९ ॥
व्योमापासाव[1] आकाश । की[2] आकासि वायो परिस ।
वायोपासाव प्रकाश[3] । तेज्योन्मय ॥ ६० ॥

---

५४. १–२ **निरांजन निरामय** तं; २ (–) ब; ३ **संग** तं; ४ **ते** ब. (–) तं.

५५. १ **सहजाचा** ब तं; २ **इछेपासाव** ब तं.

५६. १ **इछेपासाव** ब तं; २ **त्रीपद** तं.

५७. १–२ **गायत्रीपासूण** ब; ३ **जनन** ब, **जन्म** तं; ४–५ **तैथेंचि जाहाले** तं.

५८. १ **ते** ब, **तया** तं; २ **ब्रह्माचे** तं; ३ **वर्ग** ब तं; ४ **मृत्यलोकु** ब, **मृत्य** तं.

५९. या ओवींत पहिल्या चरणाचे दोन चरण करून चवथा चरण गाळलेला दिसतो. ब मध्यें ही ओवी पुढीलप्रमाणें आहे :—

**हां जि पृथिवी[1] आप तेज कांहीं । जे[2] वायो आकाश नाहीं[3]**
**तें[4] ब्रह्म कोणे[5] ठायिं । काय होतें ॥**

१ (–) तं; २ (–) तं; ३ तेंहीं तं; ४ तैं तं; ५ कवणिये तं.

६०. १ **अरे व्योमा°** ब तं; २ (–) ब तं; ३ **परीयस** तं.

त्या तेजीं आप संभवलें । आप पृथ्वीसि व्यालें ।
पंचतत्त्व रचलें । ऐसियापरि ॥ ६१ ॥
पृथ्वीचा[1] अंकुरु । तोची त्रीकोण मेरु ।
तिहिं[2] देवां[3] वस्ती वीवरु । मेरुसिखरि ॥ ६२ ॥
× × × × । तो मेरु पृथ्वीयेवरि ।
ते पृथ्वी अवधारि । कुर्मपृष्टि ॥ ६३ ॥
सप्तपाताळ भुवनी । सप्तद्विपावति मेदिनी ।
सप्तसर्गरचनी[1] । आधार मेरु ॥ ६४ ॥
पाताळिं नागकुळ[1] जाण । भुतळि[2] मानवा[3] कारण ।
देवता सुरगण । स्वर्गीं वासु ॥ ६५ ॥
आतां आसो हें[1] इतुलें[2] । आधि पंचभुत रचलें ।
मग तयापासाव जालें । चराचर ॥ ६६ ॥
शीवशक्तिचा संगमी । पींडब्रह्मांडरचना[1] आघवी ।
च्यारि खाणि प्रातुर्भवी[2] । उत्पति जालि ॥ ६७ ॥
तव[1] सिश्य ह्मणे श्रीगुरुनाथा । कैसि चहु खाणिची वेवस्ता ।
कवण कवणे ठाइं नीभ्रांता । जन्मले जी ॥ ६८ ॥

---

६१. १ व्यापिलें तं.

६२. १ तिये पृथ्वीचा ब, तो पृथ्वीचा तं; २–३ त्रीदेवता ब, त्रीवेद तं.

६३. धु प्रतींत पहिला चरण नष्ट झाला असून ब तं मध्यें तो पुढीलप्रमाणें आहे.
त्रीदेव ( त्रीवेद तं ) मेरू सिखरीं ।

६४. १ सप्तही स्वर्गस्थानीं तं.

६५. १ नागलोकु ब, °कुळें तं; २ महीतळीं तं; ३ मानवी ब, मानव तं.

६६. १–२ हेतुले तं.

६७. १ पाहावी ब्रह्मांड° तं; २ प्रारंभु भाविं ब, प्रतीभूमी तं.

६८. १ मग तं.

तव[1] ह्मणे[2] श्रीगुरु । परिस[3] चहु खाणिचा विस्तारु ।
नावेक[4] मन करिं[5] स्थीरु । होय[6] सावचीत्त ॥ ६९ ॥

पक्षी[1] मक्षि[2] कीर्म[3] जाण । अपादुपादु[4] जंतुकारण[5] ।
अैसियाचा[6] नीर्माण[7] । अंडजखाणि ॥ ७० ॥

चतुष्पाद जीतुके । मनुष्य[1] द्विपद[2] देख[3] ।
ते तुं वोळख समेक[4] । जारजखाणि ॥ ७१ ॥

सप्त धातु मुख्य[1] वर्ण[2] । धनरत्न पाशाण ।
ते[3] तुं[4] वोळख[5] पां[6] नीर्वाण[7] । स्वेतजखाणि[8] ॥ ७२ ॥

सर्व बीज आदि तृण[1] । वृक्षा[2] आदि[3] धान्य ।
तें तूं ओळख गा[4] गहन । उद्बीजखाणि ॥ ७३ ॥

चहुं खाणिचीं लक्षणें । म्या सांगिलि[1] धारण[2] ।
परि तुं आपलिया[3] मतिगुणें । मनासि आणि[4] ॥ ७४ ॥

हां जि सकळ श्रृष्टिची रचना । देवत्रयाची[1] संभवना[2] ।
अैसिं[3] कवणा[4] पासुनी[5] कवणा[6] । कैसें[7] जाहालें[8] ॥ ७५ ॥

---

६९. १ **मग** ब तं; २ **बोलिले** तं; ३ **अैकें** तं; ४ **तुझें** ब; ५ (+) **पां** तं; ६ **होई** ब तं.

७०. १–३ **पछिमपंथकर्मेछ** ब, **पक्ष मुक्ष कूर्म** तं; ४ **आपादपाद** ब, **पदआपद** तं; ५ **जलचरकारण** ब, **जंतवा करून** तं; ६ **ऐसियाच** ब ६–७ **ऐसिया जाग पां खूण** तं.

७१. १ **मनुष्यादि** ब; २ **पादमुख्य** ब; ३ **देखे** ब; ४ **सम्येके** ब ही ओवी तं मध्यें नाहीं.

७२. १ (–) तं; २ **सुवर्ण** ब तं; ३–७ **तेचि निरुते जाण** ब, **तें जाण पा खूण** तं; ८ **स्वेदज** ब, **स्वतेज** तं.

७३. १ **करून** तं; २–३ **वृक्षमुख्यादि** ब, **वृक्षमुक्षादि** तं; ४ **पां** ब तं.

७४. १ **सांगीतलीं** ब तं; २ **धारणें** ब, **धोरणें** तं; ३ **आपुलेनी** तं; ४ (+) **पां** ब.

७५. १–२ **ते कवण कवण स्थान** तं; ३–५ **ते कवण** ब; ३–६ **देवत्रयाची संभवना** तं; ७–८ **पासाव काय** ब, **तें सांगा स्वामी** तं.

ब्रह्म[१] आदि[२] अनादि । ब्रह्म सर्वादि[३] जुगादि ।
ब्रह्म श्रृष्टि नीपादि[४] । हे[५] ब्रह्मयापासुनीं[६] ॥ ७६ ॥
गर्व[१] अहंकारु क्षमा शांति । बुधी वीचार वीद्या[२] मति ।
ज्ञात[३] अज्ञात[४] हे[५] संपत्ति । ब्रह्मयाची ॥ ७७ ॥
जळीस्थळीं वीष्णु जाण । पर्वत[१] मस्तकीं[२] निर्वाण[३] ।
अग्नी[४] वायो[५] कारण[६] । हे वीष्णुरुप ॥ ७८ ॥
सीव[१] सर्वभुतिं नीरंतर । शीवमय[२] चराचर[३] ।
शिव सर्वत्र[४] जगदाकार[५] । जाणिजे गा[६] ॥ ७९ ॥
वेद शास्त्र श्रृति[१] । कवित्व कथन[२] धृति ।
नाद बिंदु कळा जोति । ब्रह्मयाची ॥ ८० ॥
माया मोहो वीवंचना । आशा त्रुशा[१] कल्पना ।
धन धान्य संपद[२] गहना । हे[३] वीष्णुरुप[४] ॥ ८१ ॥
रिधी सिधी संपन्न[१] । गजांत लक्ष्मी गहन ।
यक[२] छेत्र[३] प्रजापाळण । हें[४] वीष्णुरुप ॥ ८२ ॥
ध्यान धारण अनुष्टान । जप तप मंत्र साधन ।
यजन याजन[१] यज्ञ । हे इश्वराचे ॥ ८३ ॥

---

७६. १–२ ब्रह्म तोचि तं; ३ सर्वां ब, सकळ तं; ४ प्रतिपादी ब; ५–६ करणी ब्रह्मयाची तं.

७७. १ सर्व तं; २ (–) तं; ३–४ ज्ञान अज्ञान ब; ३–५ ज्ञान गोष्टी तं.

७८. १–३ काष्ट पर्वत पाषाण तं; ४–५ आग्नि वायु ब; ६ आपण तं.

७९. १ (–) तं; २–३ सकल शिवमय साचार ब, शिवमात्रें सचराचरू तं; ४–५ सर्व जगदाधार ब, सर्वत्रासी आधारु तं; ६ पां तं.

८०. १ स्मृति ब, श्रुति तं; २ कथा ब, कथेनें तं.

८१. १ तृस्ना ब; २ संपदा ब, सर्वपद तं; ३ तें तं; ४ विष्णुचि पाहीं ब.

८२. १ संतान ब तं; २–३ आयिक क्षेत्र ब, येकत्र तं; ४ (–) तं.

८३. १ (+) अध्यायन ब.

ब तं मध्यें ८२ व ८३ ओव्यांची अदलाबदल आहे.

सिध[1] साधे[2] संभवना[3] । वज्र वेली[4] अमरपद गहना ।
प्रकाया[5] प्रवेपुत्पवना[6] । हे इश्वराचें ॥ ८४ ॥
हां जि हिं बाहिरिल[1] लक्षण । अभ्यांतरिचे कवण कवण ।
हें दातारें नीरोपण । कृपादृष्टि[2] ॥ ८५ ॥
तव श्रीगुरु म्हणे रे कुमरा । अमृतनंदा[1] योगेश्वरा ।
आत्मज्ञान अभ्यांतरा । परिस आतां ॥ ८६ ॥
मातापीतयाचे संगमि । पींडब्रह्मांड[1] आघवी ।
पंचभुते पातुर्भवी । वस्तुसहित ॥ ८७ ॥
शुक्ल[1] श्रोणीत मीनलें । रज[2] रक्त[3] यकवटलें ।
तें[4] देहिं[5] संभवलें[6] । तीन्ही[7] देवं[8] ॥ ८८ ॥
शुन्य तें साकारलें । देह ऐसें नांव पावलें ।
ते देहि संभवलें[1] । देवत्रय[2] ॥ ८९ ॥
रजिं[1] ब्रह्मा वीचारि । सत्वीं[2] रहिवास[3] हरि[4] ।
तमीं[5] देव निर्धारि । रुद्र आपण ॥ ९० ॥
ऐसी त्रीवीध संभवना । पीडब्रह्मांडरचना[1] ।
त्रीगुणात्मक जाणा । शेरीर हें ॥ ९१ ॥

---

८४. १–२ **संधीसाधी** ब; १–३ **साध्य सिध्धी संभाषण** तं; ४ **वोळी** तं; ५–६ **परकायाप्रवेशु उत्पवना** ब तं.

८५. १ **बाहीज** ब तं; २ **कृपाबुद्धी** ब तं.

८६. १ **अमृतानंदा** ब तं.

८७. १ (+) **रचना** ब. ब मध्यें या ओवीचा ३ व ४ चरण नसून तं मध्यें ही ओवी मुळींच नाहीं.

८८. १ **तरी शुक्ल** ब; २–३ **रजरेत** ब, **राजबीज** तं; ४–६ **उभये संमधी जाले** ब, **उभय संगमीं जाहालें** तं; ७–८ **स्थुल देह** ब तं.

८९. १ **विश्रामले** ब, **विभ्रमले** तं; २ **तिन्ही देव** ब तं.

९०. १ **सत्वीं** ब तं; २ **रजिं** ब तं; ३–४ **विष्णु मुरारी** ब; ५ **तीन्ही** तं. तं मध्यें ९० व ९१ ओव्यांची अदलाबदल आहे.

९१. १ **ब्रह्मांडपंचभूतरचना** ब.

वामभार्गी[१] इडा[२] जाण । दक्षणे पींगळा कारण ।
मध्य सुत्र[३] निर्वाण । सुक्ष्मना[४] ते[५] ॥ ९२ ॥

अैसे त्रीगुणात्मक शरिर जाण । दक्षणे पीगळा कारण ।
मध्य सुत्र नीर्वाण । शुशुन्मा ते ॥ ९३ ॥*

अैसे[१] त्रीगुणात्मक शरिर[२] जाण[३] । सहजस्छिति[४] ते कारण ।
वस्तुवीस्तार[५] वीवर्ण[६] । सिध[७] सहज[८] ॥ ९४ ॥

वामांगी वीष्णु स्थिति । दक्षेणे ब्रह्मा प्रजापति ।
मध्यें शुशुन्मा[१] संगति । वीस्वरुप[२] ॥ ९५ ॥

दक्षणे सुर्य जाण । वामार्गी चंद्र आपण ।
अग्निचें गमन । मध्यसुत्र[१] ॥ ९६ ॥

पृथ्वि आप तेज कारण । वायो आकाश जाण ।
पंचभुतांचे पंचवीस गुण । शरीर हें ॥ ९७ ॥

अैसें[१] पंचभुतिक[२] शरिर जाण । जाणावे[३] यकमेकाचे[४] गुण ।
अैसिया नाम पंचीकर्ण[५] । प्राणसंख्या[६] ॥ ९८ ॥

पींड पृथ्विचा जाण । रुधिर आप आपण[१] ।
तेज अग्निचें जाण । तुल्यरुप[२] ॥ ९९ ॥

---

९२. १ **वामांगिं** ब तं; २ **विरडा** तं; ३ **सूत्री** ब तं; ४–५ **सुषुम्नातें** ब, **सूक्षेमणातें** तं.

९३. *ही ओवी ब तं मध्यें नाहीं. ती द्विरुक्त दिसते.

९४. १ **अैसी** ब तं; २–३ **पिंडधारण** ब; ४ **सहज स्तुती** तं; ५–६ **वस्तुविवरण**; ६ **विवरण** तं; ७–८ **सहजसिद्ध** तं.

९५. १ **सुषुम्ना** ब, **सूक्षेमण** तं; २ **शिवस्वरूप** ब तं.

९६. १ **मध्यसूत्री** ब, **मध्यें सूत्र** तं.

९८. १ **ऐसी** ब तं; २ **पंचभूतें** तं; ३–४ **येकयेकाचे पांच पांच** ब तं; ५ **पंचिकरण** ब, **पंचकरण** तं; ६ **प्राण साक्षी** तं.

९९. १ **प्रमाण** ब; २ **उष्णरूप** ब, **विष्णुरूप** तं.

वायो तोचि पवन जाण । आकाश पोकळि सुन्य ।
अैसें[1] पंचप्रोक्त[2] जाण[3] । शरिर[4] हें[5] ॥ १०० ॥
अस्ति चर्म मजा । रोम नाडि सहजा ।
ते तुं वोळख गा[1] नीजा । पृथ्वीरुप ॥ १०१ ॥
लाळ मुत्र स्वेदज । शुक्र श्रोणित बीज ।
तें तु वोळख गा नीज । आपरुप[1] ॥ १०२ ॥
क्षुधा त्रुष्णा तथा[1] निद्रा । आळस मैथुन भेदा[2] ।
तें तु जाण[3] चतुरा । तेजरुप ॥ १०३ ॥
धावन वळण[1] आकोचन । नीरोधन आणि स्फुंदन[2] ।
तेची निरुतें जाण । वायुरुप ॥ १०४ ॥
काम क्रोध शोक[1] मोहो । लज्जा[2] प्रातुर्भववो[3] ।
जाण[4] सहजस्वभावो[5] । आकाशाचा[6] ॥ १०५ ॥
सुन्यरुप प्रकाशलें[1] । तेथें[2] स्थुळ[3] रुप[4] प्रभासलें[5] ।
परयक[6] वीलया गेलें[7] । तें[8] जाहालें[9] सुन्यरुप ॥ १०६ ॥
अैसि[1] हिं[2] पंचभुतें । यकमेका[3] प्रसवतें[4] ।
पुनरपि वीलया गेलें[5] तेथें[6] । येकमेकी ॥ १०७ ॥

---

१००. १–३ **ऐसी पंचीकरण** ब; ४–५ **जाणिजेसु** ब.

१०१. १ (–) ब तं.

१०२. १ **आपाचें** तं.

१०३. १ (–) ब तं; २ **भद्रा** ब, **आधारा** तं; ३ (+) **पां** ब तं.

१०४. १ **गमन** ब तं; २ **फुंदन** ब तं.

१०५. १ **लज्या** ब तं; २–३ **कामना प्रातुर्भावो** ब, **मनकामना प्रीतीभावो** तं; ४–५ **तो ज्ञान पैसावो** तं; ६ **आकाश ह्मणउनी** तं.

१०६. १ **प्रकाशले** ब; २–५ **ते स्थलनावे प्रवेशले** ब; ४–९ **निमालें** तं; ६ **पृथक** ब तं; ७ **गेले** ब; ८ (–) ब तं; ९ **जाले** ब.

१०७. १–२ **ऐसीया परी** ब तं; ३ **यकेयेक** ब; ४ **प्रकाशवंते** तं; ५–६ **जातें** ब तं.

हां जि श्रीगुरुराया । पंचभुतें[1] जाति विलया ।
स्थान[2] स्छीति कवण काया[3] । तें[4] सांगिजें[5] जि[6] ॥ १०८ ॥
नादबिंदुचें कवण स्थान । कोठे वस्ति मनपवन ।
चंद्रसुर्याचें भुवन । तें[1] सांगा स्वामि ॥ १०९ ॥
नाभिचक्रि पवन जाण । हृदयचक्रीं मन ।
बीदुचें[1] स्थान[2] नीर्वाण । सिरचक्रीं ॥ ११० ॥
नाभिचक्रीं दीनकरु । शशि हृदइं नीरंतरु ।
उभयसंगमी[1] परिकरु । अमर बोलि[2] ॥ १११ ॥
प्राणु[1] मनु[2] बोलि[3] दोन्ही । असति पवनाचे स्थानी ।
तोचि पवनु जननी[4] । ब्रिंदु श्रुतिचा ॥ ११२ ॥
श्रुति श्रृत[1] जाण । अहेर्णिसि[2] बिंदु कारण ।
श्रृतिं[3] तेज नीर्वाण । बिंदुस्थानी ॥ ११३ ॥
मन इंद्रियां कारण । मना[1] मध्य[2] नीराजन[3] ।
मनसोहं नीर्वाण । तापसरुप[4] ॥ ११४ ॥
सूर्याचे स्थान कीं जाण । वक्र[1] ग्रहे असति दारुण ।
वीसंतेज[2] नीर्वाण । सूर्यस्थिति[3] ॥ ११५ ॥

---

१०८. १ ऐसीं पंच ब, हे तं; २ तरी स्थान ब तं; ३ कार्या ब, का× तं; ४–५ सांगीजो ब ; ५–६ सांगा स्वामी तं.

१०९. १ (–) ब.

११०. १–२ बिंदुस्थान ब.

१११. १ उभय समाधी ब; २ वेली ब तं.

११२. १–३ हें मन आणी प्राण तं; ३ (–) ब; ४ जान ब, जनीं तं.

११३. १ श्रोत ब, सती तं; २ नयनासी ब तं; ३ तुचि ब, मनीं शुध तं.

११४. १–३ मनीं ध्यानीं रजनी जन तं; २–३ मधों निरंजन ब; ४ आत्मरूप तं.

११५. १ (–) ब तं; २ विषतेज ब, विश्वतेज तं; ३ सूर्यस्थानी तं.

चंद्र आयुश्य आपण । चंद्र बळ संपूर्ण ।
चंद्र[1] स्थिति[2] प्राण । जाण[3] नीरुतें[4] ॥ ११६ ॥
प्राण ह्रद्रयकमळिं । अपान गुदमंडळिं ।
व्यानु असे[1] नेहाळी[2] । सर्वशरिरि[3] ॥ ११७ ॥
उदान असे कंठिं । समान नाभिये देंठि ।
हे प्राणपीठिका गोमटि । जाण नीरुते[1] ॥ ११८ ॥
कूर्म प्राणासि[1] दैवत । अपान गुप्तरुप ध्यात ।
समान असे बोळगत । नागकुळ[2] ॥ ११९ ॥
दैवताचे[1] स्मरण । व्यान करित असे आपण ।
धनंजयो निर्वाण । उदानासि[2] पैं[3] ॥ १२० ॥
प्राणबिंदु[1] निश्चळ । अपान सोखि[2] मळ ।
समान तेज केवळ । नीरुते जाण ॥ १२१ ॥
उदान[1] श्वरु[2] जाण । व्यानु आधार[3] प्राण ।
पंचभुत[4] प्रकृति[5] लक्षण[6] । सांगितलें[7] ॥ १२२ ॥
बींदु सरलिया पाठि । प्राण होय हिंपुटि[1] ।
आपान सरलिया पाठि । बळ क्षिग ॥ १२३ ॥

---

११६. १-२ स्थिति तेचि ब तं; ३-४ जाणा निरुति ब, निरुतें पैं गा तं.

११७. १ तो ब तं; २ न्याहाळीं तं; ३ सर्व शरीर हें तं.

११८. १ निरुती ब तं.

११९. १ प्राणाचें ब तं; २ °कुळीं ब तं.

१२०. १ देवदत्ताचें ब तं; २-३ उदानेसीं पैं ब तं.

१२१. १ प्राणें बिंदु तं; २ सेखीं तं.

१२२. १ उदानीं ब तं; २ स्वरूप ब तं; ३ आधारें तं; ४-६ पंचप्रकृतिखूण ब, पंचीकृत खूण तं; ७ सांगितली ब तं.

१२३. १ हीन पुष्टी तं.

तेज सामानी[1] ग्रासिलें । स्वरु[2] उदानी बुडालें ।
जीव ध्यानि[3] आवरिलें[4] । निरुते[5] जाण[6] ॥ १२४ ॥
रुप नयनी देखणे । शब्द श्रवणि परिसणें ।
परिमळ घ्राणि घेणें[1] । जाणिजे गा ॥ १२५ ॥
सुस्वाद[1] रस[2] जिव्हा । हस्तपाद स्पर्शभावा[3] ।
हे कर्म इंद्रियांचे स्वभावा[4] । जाण नीरुतें ॥ १२६ ॥
स्वरुप अंकुर[1] जीतुके । नयनी[2] पाहाति कवतुकें ।
परि भोग भोगणे यक[3] । मनच[4] किं ॥ १२७ ॥
नाना काव्यपुराणें । वेदशास्त्र जाण[1] ।
परिसावें श्रवणें । परि चोजवणें[2] मनच[3] किं[4] ॥ १२८ ॥
सुगंध दुर्गंध परिमळ जाण । घ्राण पारखि आपण ।
उपरि[1] उपभोगाची खुण । मनचि जाणे ॥ १२९ ॥
शडरसाचे[1] लक्षण । जिव्हा जाणे आपण ।
परि मनेंवीणें कवणें[2] । भोगु करि ॥ १३० ॥
कर्म इंद्रियें तैसिच जाण । मन समस्तांसि कारण[1] ।
मनापासुनि वीवरण । इद्रियांसि ॥ १३१ ॥

---

१२४. १ **समानी** ब तं; २ **स्वर** ब, **खर** तं; ३ **व्यानीं** ब तं; ४ **विराले** ब तं; ५–६ **जाण निरुते** ब तं.

१२५. १ **भोगणें** ब तं.

१२६. १–२ **शब्दु स्वादु** ब तं; ३ **स्पर्शभाव** ब तं; ४ **स्वभाव** ब, **भाव** तं.

१२७. १ **एकरूप** ब, **कुरूप** तं; २ **ते नयन** ब तं; ३ **येकें** ब तं; ४ **मनेंचि** ब तं.

१२८. १ **उगवणें** ब तं; २–४ **भोक्ते मन** ब तं.

१२९. १ **परी** ब तं.

१३०. १ **षड्रसाचें** ब; २ **कवण** ब तं.

१३१. १ **करण** ब.

वामदक्षणे भार्गी[1] । इडा पिंगळा दोघि ।
शुशुम्ना संयोगि । मध्यसुत्र ॥ १३२ ॥

शुशुम्ना स्वर्गीची वाट । उघडे ब्रह्मरंध्राचे[1] कपाट ।
बुझे तो[2] निकंठ[3] । सहजसिध[4] ॥ १३३ ॥

उर्धमुखि[1] दिनकरि[2] । सोम वरुष मृतोधारिं[3] ।
सित[4] सोम अवधारिं[5] । श्रुल्की[6] रवि ॥ १३४ ॥

चंद्राचिया अमृता । रवि ग्रासि नीरुता ।
तेचि होय नीभ्रांता । काळकुट ॥ १३५ ॥

हां जि श्री गुरुनाथा । राउळें नीरोपिलें समस्ता ।
आतां प्राणायाम निर्गता[1] । नीक्षेपिजो[2] जि ॥ १३६ ॥

तव श्रीगुरु म्हणे रे कुमरा । अमृतनंदा[1] योगेश्वरा ।
आत्मज्ञान[2] अभ्यांतरा[3] । परिस[4] आतां ॥ १३७ ॥

वज्रासन[1] दृढ करिं । इडापूर्वक्र करिं[2] ।
पिंगळा रेचकु करिं । मउमंदा[3] ॥ १३८ ॥

पुनरपि पींगळा । क(री)[1] परिपूर्वक[2] केवळा ।
कुंभक राखोनी निश्चळा । उदम[3] राजी[4] ॥ १३९ ॥

---

**१३२.** १ **मार्गी** ब तं.

**१३३.** १ **ब्रह्मद्वाराचें** ब, **ब्रह्मइंद्रियांचें** तं; २ (+) **विरुळा** तं; ३ **निघोट** ब; ४ **सहजसिद्ध** ब तं.

**१३४.** १ **उर्ध्वमुख** ब, **उर्ध्वमुखें** तं; २ **दिनकरु** ब तं; ३ **अमृतधारीं** ब तं; ४ **शिव** ब तं; ५ **अवधारु** ब तं; ६ **शक्ति** ब तं.

**१३६.** १ **उर्ध्वगत** ब तं; २ **तें निरोपिजे** ब तं.

**१३७.** १ **अमृतानंदा** ब तं; २–३ **प्राणायाम परिकरा** ब तं; ४ **सांगेन** ब तं.

**१३८.** १ **आरे वज्रासन** ब तं; २ **भरीं** ब तं; ३ **मंदु मंदु** ब तं.

**१३९.** १ **करी** ब तं; २ **पूर्वकु** ब तं; ३–४ **उदरा माजी** ब तं.

गुद आकोची[1] त्राहाटक । जाउनी आदळे रवि पीठक[2] ।
त्याणे[3] होय आहिक[4] । हृदयपद्म[5] ॥ १४० ॥
त्रीवीधाची[1] बळकटि । अग्नि[2] प्रजळे[3] त्रीकुटि ।
तेजकीर्ण[4] सरे[5] नेहटि[6] । शशिमंडळी[7] ॥ १४१ ॥
ते भेदुनी समस्थान[1] । करि साउमे गमन ।
तेणे विकाश[2] पावे[3] वदन । तापसियाचें[4] ॥ १४२ ॥
मग तया कमळा आंतु । प्रवेश करि पवननाथु ।
प्राणायामाची मातु । साच[1] करि[2] ॥ १४३ ॥
बैसोन आसन[1] नेहटि । सम करावी[2] दृढ दृष्टी ।
वामवेंकटि उपराठी । लंबिका[3] करिं[4] ॥ १४४ ॥
बंधु[1] घेइजे[2] जाळांधरिं । पवन राखोनी[3] अभ्यांतरीं[4] ।
तेथें ध्वनी उमटे अंबरिं । नाना वाध्य ॥ १४५ ॥
ते[1] ध्वनी[2] मावळे[3] । उठति[4] रोमाचे[5] कंटाळे[6] ।
तयानंतरें विवळे । तेजोन्मयु ॥ १४६ ॥

---

१४०. १ आकोचनि ब, आकोचोनी तं; २ स्थानक ब, स्थका तं; ३ तेणें उर्ध्व तं; ४ आइका ब तं; ५ गुप्त दम तं.

१४१. १ त्रिबंदाचिये ब, त्रीबंधाचिये तं; २ आज्ञ ब; ३ पावले तं; ४–६ तेणसाखिणि सूत्रें आंदले त्रिकुटी ब, तें सखीनें सूत्रें आदळे त्रीबेटीं तं; ७ °मंडळा तं.

१४२. १ सोमस्थान ब तं; २–३ विकाशले ब, विकासे तं; ४ तपस्वनीचें ब तं.

१४३. १–२ हे खेचरी दीक्षा ब तं.

१४४. १ आसना ब; २ करी ब तं; ३ लंका ब, लंबिका तं; ४ करी ब तं.

१४५. १ बंदु ब; २ देयिं ब, देऊनी तं; ३ राखै ब; ४ भीतरी ब तं.

१४६. १ उठोनि ब, उठती तं; २–३ रोमकांटाळे ब तं; ४–६ सम होती ज्ञानचक्षु युगुळें ब तं.

ते तेज[1] न धरे दृष्टि । सवेच लागे संपुष्टी[2] ।
तेची जाणावी[3] प्राण[4] सेवटी । समाधिलहरि ॥ १४७ ॥

जो समाधि संतला[1] । आणि[2] उन्मनि भुतला ।
योगनीद्रे नीदेला[3] । राजयोगी ॥ १४८ ॥

तेणें[1] संसार केला ठेंगणा । काळकाम[2] घातला आंकणा ।
त्या[3] योगेश्वराचा राणा । साधकेश्वरु ॥ १४९ ॥

तो त्रीभुवनी भरि[1] दुजाण[2] । जाहाला[3] तत्वरुपिं[4] नीर्वाण ।
चुकले[5] जरामरण । जाहालि काळवंचना ॥ १५० ॥

हाची बोलीजे सहजयोगु[1] । कैसा[2] बोलीजे[3] तेथीचा[4] सयोगु[5] ।
तो[6] दातारा[7] नीरोपीं[8] मज वेगु[9] । कृपाबुधि ॥ १५१ ॥

तव श्रीगुरु म्हणे रे अमृतनंदा[1] । तेथील वीप्रीत[2] विनोदा ।
विस्वरुप सदानंदा[3] । अनुपम्य तें ॥ १५२ ॥

तया शाखा ना मुळ । फुळ[1] ना फळ ।
जाति[2] ना कुळ । ऐसें ब्रह्म तें[3] ॥ १५३ ॥

पांहें[1] पांचै[2] भुतें । विस्तारलि[3] वस्तुसहितें ।
परिपूर्ण वीश्वभरितें । लोकत्रइ ॥ १५४ ॥

---

१४७. १ **तेजीं** ब तं; २ **संपुटी** ब तं; ३–४ **जाण पां** ब तं.

१४८. १ **सुतला** ब तं; २ (–) ब तं; ३ **निजेला** ब तं.

१४९. १ **ते** ब; २ **कलिकालु** ब तं; ३ (–) ब तं.

१५०. १ **भरित** ब तं; २ **आपण** ब तं; ३ **आपण जाहला** ब तं; ४ **°रूप** ब तं; ५ **चुकलें** तं.

१५१. १ (–) ब तं; २–५ **कैसें पां तेथीचे गुज** ब तं; ६–८ **तें दातारें निरोपावें** ब तं; ९ (–) ब तं.

१५२. १ **अमृतानंदा** ब तं; २ **विपरीत** ब तं; ३ **सानंदा** ब, **स्वानंदा** तं.

१५३. १ **पुष्प** ब तं; २ **याति** ब तं; ३ (–) ब तं.

१५४. १ **पाहातांच ही** ब; २ **प्रसवली** ब, **प्रवेशली** तं.

सहजिं यणे जाणें । सहजी निश्चळ राहाणे ।
सहजिं[1] बुझेनीबुझणे[2] । सहजस्थिति ॥ १५५ ॥

चौंखाणिपरुता । जन्म नाहि निभ्रांता ।
पंचभुतांसहिता । वस्तुसहित[1] ॥ १५६ ॥

चौखाणिपरति जात । उन्मनी राहे नीभ्रांत ।
बुझोनी आत्मतत्व । सहजस्थिती ॥ १५७ ॥*

पांहें पा कनक यक । मुशणे होति अनेक ।
प्रथक् मुसिस घातलीया देख । यकचि[1] जाहालें[2] ॥ १५८ ॥

नातरि उदकामाजि देख । तरंग उठति अनेक ।
फुटोनी[1] जाहाले[2] अनेक[3] । यकमेकी[4] ॥ १५९ ॥

म्हणुनी कल्पु नको कांहिं । होइल तेंची पांहिं ।
नीवसिल[1] ठांइचा ठाइं । सोहंबुधी[2] ॥ १६० ॥

सर्व जीवांचे जीवन । नाहिं दूसरें अन्न ।
अैसें होय ज्ञान । तरि मुक्तची तुं ॥ १६१ ॥

पांहें पां पांचैं भुतें । वीस्तारलिं[1] वस्तुसहितें[2] ।
× × × । तरि[3] मृत्यु कैंचा ॥ १६२ ॥

---

१५५. १–२ सोहंभावीं बुझणें ब तं.

१५६. १ वस्तुचि देखे ब, वस्तु तं.

१५७. *ही ओवी ब तं मध्यें नाहीं.

१५८. १–२ कनकचि होय ब तं.

१५९. १–३ सर्वेचि स्फुटित जालियां देख ब तं; ४ आयिक काय उरलें ब तं.

१६०. १ निश्चित ब तं; २ सोहंबोधें ब, सोहंबोध तं.

१६२. १–२ आहाति वेगळालिये निभ्रांतें ब तं; × ( ३ रा चरण ) वस्तु सहजिचि तुतें ब तं; ३ (–) ब तं.

आपपर हे दोन्हि । सांडि द्वैताची घासणि[1] ।
भ्रांताच्या[2] स्थानि[3] । गुफो[4] नको ॥ १६३ ॥

मीं[1] आणि माझें । सांडि कल्पनेचें वोझें ।
तरि तुची सहजें । वीस्त्रंभरितु ॥ १६४ ॥

नको जप तप कांहिं । ध्यान धारणा पांहिं ।
समाधि शोधना[1] तेहि । कल्पनारुप ॥ १६५ ॥

शोधुनी भुमीका । बीज पेरिलें देखा[1] ।
तेथें उगवल्या फारिका[2] । फळ[3] न[4] लगे जैसें[5] ॥ १६६ ॥

म्हणोनी[1] कर्म ते बीज । अमोघ[2] मोघणे[3] तुज[4] ।
तरि होयं पा नीज । नीःकर्मातें[5] ॥ १६७ ॥

हा[1] सहज स्थितिबोधु । वीरुळा बुझे वीनोदु ।
यरांसि समंधु । नाहिं यथ[2] ॥ १६८ ॥

क्षीरि[1] नीर मीनले । ते राजहंसें करावें वेगळें ।
तयांचे अनुभउ[2] काउळे । जाणे केवि ॥ १६९ ॥

---

१६३. १ **घसणी** ब तं; २–३ **मी माझियेपणीं** ब, **मी माझीये पाहाणी** तं; ४ **गुंफो** तं.

१६४. १ **आर मीं** ब तं.

१६५. १ **साधन** ब तं.

१६६. १ **आयिका** ब तं; २ **देखा** ब, **पैका** तं; ३–४ **पाळण** तं; ५ **कैसा** ब, **कैसें** तं.

१६७. १ **तरी** ब, (–) तं; २–४ **भोग भोगविल सहज** ब तं; ५ **निष्कर्म तें** ब, **कर्म तें** तं.

१६८. १ (–) ब तं; २ **तेथें** ब तं.

१६९. १ **क्षिर** ब तं; २ **सुख** ब तं.

मेघ वरुषत आहे । बीज[1] उत्पत्ति[2] होय ।
तो[3] काय[4] जाणत[5] आहे[6] । माझे[7] ह्मणोनी ॥ १७० ॥

दिपक लागला मंदिरिं । केउति[1] गेली[2] पां[3] आंधारिं ।
ते[4] सांग पां निर्धारिं । काय जालि ॥ १७१ ॥

अथवा[1] सुर्य प्रकाशतां । अंधकारू पळाला[2] केउता ।
अैसें[3] सांग पां निभ्रांता । मजप्रति ॥ १७२ ॥

नातरि[1] गगनि मेघपडळ । व्यापुनि ठेलें[2] अंतराळ[3] ।
क्षीणा यक सकळ । अथिचीना ॥ १७३ ॥

नातरि[1] बाभुळि[2] जळ । व्यापुनि ठेलें सकळ ।
तैसें हे मायापडळ । विशयसुख[3] ॥ १७४ ॥

सपनिचे सुख कांहिं । जागृत[1] जालिया[2] नाहिं ।
तैसेचि जाण पा[3] तेहिं[4] । मायाप्रपंचु[5] ॥ १७५ ॥

रोहिणि तोयभरितें । दृष्टि दिसे अवचीतें[1] ।
निर्धारिता तेथें । अथीचीना[2] ॥ १७६ ॥

जाण[1] प्रपंच केवळ । मीथ्या मायापडळ ।
यक[2] वस्तुचि[3] केवळ[4] । वीस्तारलि ॥ १७७ ॥

---

१७०. १ उद्बीज ब तं; २ खाणी त्या क्षणि ब, खाणी त्याचेनि तं; ३–६ परी तो जाणे काय ब तं; ७ आपुले ब तं.

१७१. १–२ कोठें लपाली ब तं; ३ (–) ब, ते तं; ४ (–) ब तं.

१७२. १ (–) ब; २ लपाला ब; ३ (–) ब तं.

१७३. १ तरी ब; २–३ रविबिंब किल ब, रविबिंब किरळ तं.

१७४. १ जैसें ब, ऐसें तं; २ बाबुळी ब तं; ३ प्राणियांसि ब तं.

१७५. १–२ जागृती कांहींच ब तं; ३ या तं; ४ देहीं ब तं; ५ विषय-सुख ब तं.

१७६. १ अैसेंचि तें तं; २ देखिजेना ब तं.

१७७. १ जाणावा ब, तैसा जावा तं; २–४ येकचि वस्तु सकल ब तं.

रविप्रकाश[1] गगनि । आणि सुर्यकांत मेदिनी ।
त्या दोहि मध्य वन्हि । कल्पिला कवणे ॥ १७८ ॥

पांहें पा सिळा सोमकांति । ते चंद्रप्रभेसि द्रवति ।
त्यामाजि जिवनस्थिति । होति[1] कोठे[2] ॥ १७९ ॥

शाखा मुळांसि[1] तरुवरू । पांहें पा वटविस्तारु ।
सांग पा निर्धारु । बिज केव्हढें ॥ १८० ॥

अैसा[1] अकल्पित वेव्हारु । कल्पीला[2] असे[3] संसारु ।
परब्रह्म साहाकारु[4] । अनंत हा ॥ १८१ ॥

द्रिष्टि देखसि समस्त । तेंची[1] ब्रह्म जाण पा नीश्चीत ।
अैसे ज्ञान होय निभ्रांत । तरि बंधन कैंचें ॥ १८२ ॥

वीश्व हे[1] अवघेची मुक्त । प्रपंच नाथीला मीथ्यत्व[2] ।
कल्पना असे बोधीत[3] । प्राणियासि ॥ १८३ ॥

म्हणोनी जग[1] मोहिलें[2] । ब्रह्म वीस्तारलें सगळें ।
नाहिं दुसरें वेगळें । अभिन्न तें ॥ १८४ ॥

अभीन्न अवीनाश अमुळ । अनंत आगोचर अकळ ।
निर्वीकल्प नीर्मळ । परब्रह्म तें ॥ १८५ ॥

---

१७८. १ **रवि प्रकाशें** तं.

१७९. १–२ **कोठें होती** ब तं.

१८०. १ **मुळेंसि** ब तं.

१८१. १ **ह्मणउनि** ब तं; २–३ **कोण कल्पिला हा** ब तं; ४ **साकारु** ब तं.

१८२. १ (–) ब तं.

१८३. १ (–) ब तं; २ **ह्रदयांत** ब तं; ३ **बांधीत** ब, **बाधीत** तं.

१८४. १–२ **जगचि केवल** ब तं.

म्हणोनीया कारण । गुरुदाशत्त्व[1] करणे ।
मग[2] कर्मावेगळे होणें । श्रीगुरुकृपेने[3] ॥ १८६ ॥

यजन याजन यज्ञ । जप तप अनुष्ठान ।
दान व्रत पुजन[1] । हे कर्मची जाण ॥ १८७ ॥

म्हणउनि कर्म तेची बंधन[1] । प्रथक्[2] भोगावया कारण ।
होइ[3] नीःकर्म नीर्वाण । तरि अवीनाश तुं[4] ॥ १८८ ॥

तुज[1] मज[2] तु[3] आतां[4] । का रे सिणतोसि[5] वृथा ।
पांहें पां नीभ्रांता । वडिल[6] तुं ॥ १८९ ॥

तुजसिं[1] वेगळें[2] पांहे[3] । कवणी वियोग[4] आहे[5] ।
कर्म अकर्म[6] अभ्याससि[7] काय । योग साधिं[8] ॥ १९० ॥

करु[1] नको कांहिं । सहजस्तिति[2] राहिं ।
आप आपणयातें पाहिं । वीश्वंभरितु ॥ १९१ ॥

पांहे पां पांचै भूतें । अभंग अवीनाश अनंतें ।
जन्म मरण केउतें[1] । कैचें तुज ॥ १९२ ॥

---

१८६. १ **गुरुदासीत्व** ब, **गुरुदास्यत्व** तं; २ (+) **त्या** ब, (+) **या** तं; ३ **गुरुकृपा** ब तं.

१८७. १ **पुण्य** तं.

१८८. १ (+) **जाण** ब, २ (+) **भोग** तं; ३ **होईल** ब तं; ४ (–) ब, **तूंची** तं.

१८९. १–४ **तुजमाजि तूं असतां** ब तं; ५ **कष्टसि** ब तं; ६ **कोठील** ब तं.

१९०. १–३ **तुजसि वेगळे काये** ब तं; ४–५ **वियोगें लाहे** ब तं; ६ (–) ब; ७ **अभ्यासीं** ब तं; ८ **करिसी** ब तं.

१९१. १ **तूं करूं** ब तं; २ **सहजस्थिति** ब तं.

१९२. १ **तूतें** तं.

अनुक्रम २२१२३ वि: ३१०४ क्रमांक २२०२३ नों: दि:

पांचामाजि साउवें । ते[1] नीरुत्ते वोळखावें ।
तेची होउनि राहावें । स्वयंबोधि[2] ॥ १९३ ॥

अैसे ब्रह्मज्ञान जाणीजे । पाठि जीजे[1] अथवा[2] मरिजे ।
सहजस्तित्ति राहिजे[3] । सोहंभावें[4] ॥ १९४ ॥

या नांव[1] नववीधा[2] भक्ति । हे विवलें[3] अैसी मति ।
श्रीगुरुकृपेचीया संगति । वाचुन[4] नव्हे ॥ १९५ ॥

सत्वि ब्रह्मा रजि विष्णु । तमि रुद्र असे आपण ।
पांहे पां तुचि कवणु । ध्यासिल[1] काय ॥ १९६ ॥

वीचारिता पांहिं । तुज वेगळे[1] कांहि ।
मग[2] तय[3] ठांइं । वीश्राम[4] तुज[5] ॥ १९७ ॥

विचारुनि[1] पाहातां । नाहिं दूसरा तुजपरुता ।
तुची मुक्त रे[2] सर्वथा । हे भाक[3] माझि ॥ १९८ ॥

ह्मणउनि अकल्पीत राहिं[1] । योगराज पाहिं ।
अनुभवी होइं । सहज सुखिया[2] ॥ १९९ ॥

इति योगराजटिळक ग्रंथा[1] । भक्तिप्रदान[2] अभ्यासितां[3] ।
होय[4] ज्ञान[5] त्वरिता[6] । ततक्षणि ॥ २०० ॥

---

१९३. १ (–) ब तं; २ सोहंबोधु ब, **सोहंबोधें** तं.

१९४. १–२ **जी जो कां** ब तं; ३ ××जे ब, **बुझिजे** तं; ४ **सोहंभावि** ब तं.

१९५. १–२ **नांवें** ब तं; ३ दिद्ले ब, **वींवेळे** तं; ४ **वांचूनि** ब तं.

१९६. १ ध्यासी ब तं.

१९७. १ ××ल ब, **वडील** तं; २–३ **मग ते तुझा** ब, **मातें तुझा** तं; ४–५ **विश्रामलें** ब तं.

१९८. १ मज **विचारुनि** ब तं; २ **चि** ब तं; ३ **भाष** ब.

१९९. १ **होई** ब तं; २ **सुखें** ब तं.

२००. १ **ज्ञान** ब तं; २–३ **ग्रंथ भक्ति प्रतिपादनः** ब तं; ४–६ **अभ्यासितां होय ज्ञान** ब तं.

अहा ग्रंथ अभ्यासितां । ज्ञान होय त्वरितां ।
सम[1] दरुशण[2] जन्ममृत्या । अथीचीना[3] ॥ २०१ ॥

नानावर्ण गाइ । क्षीर यकवर्ण पांहिं ।
मीळालिया यके ठाइं । नीवाडों[1] नेणें[2] ॥ २०२ ॥

शुद्ध जंबुनंदाचे तकट[1] पाहिं । सारिखें दिसे दोहिं वाहिं ।
तया ना दिसे कांहिं । फाटिपोट[2] ॥ २०३ ॥

जया[1] गुरुकृपा नीकट । तत्त्वधिरुप[2] यकवट ।
तयाचे हृदय चोखट । तयाचे[3] परि ॥ २०४ ॥

कांपुसाचा दोरा पाहें । स्वरुप यकचि आहे ।
वेगळा भावितोसि काय । ते[2] सत्य मानु ॥ २०५ ॥

स्वरुपिं मिरवे साउली[1] जैसि[2] । तवा[3] तुं[4] यकचि परियसि[5] ।
वेगळि[6] प्राणायासि[7] । बीजें[8] दीसे ॥ २०६ ॥

तेजा आणि त्रीमीरा । नाहि प्रकारु[1] दूसरा ।
प्रकाश आणि दिनकरा । कैचे दूजे ॥ २०७ ॥

रत्न आणि कीरळें[1] । केवि होय वेगळें ।
अमृता आणि चंद्रकळे । केवी भीन्न[2] ॥ २०८ ॥

---

२०१. १–२ **सम्यक् दर्शनें** ब तं; ३ **आधिचीना** ब.

२०२. १–२ **तें निवडे कैसें** ब तं.

२०३. १ **तगट** ब तं; २ **पाठी ना पोट** ब तं. ब मध्यें चरण २ व ३ नष्ट.

२०४. १ जे ब, जो तं; २ **तत्त्वाधिरूप** ब तं; ३ **त्याचि** तं.

२०५. १ **तैसा स्वरूप** तं; २ (–) तं.

२०६. १–२ **साउला** ब तं; ३–४ **तवं तंतु** ब, **तत्वता तां** तं; ५ **सगळा** ब तं; ६–७ **प्राणियांसी वेगळा** ब तं; ८ **जेवीं** ब तं.

२०७. १ **भेदु** ब तं.

२०८. १ **कीळें** तं; २ **विभिन्ना** ब.

तेवी तत्त्वाधिरुप ते[1] कैसें । कीं[2] शुभ्र वश्र जैसें ।
मिळालीया रंगा सरिसें । सस्वरुप[3] जैसें[4] ॥ २०९ ॥

ना[1] तरि[2] आणिक यक पाहें । जैसें गौतमींचे तोय ।
मीळालिया वर्णा[3] सारिखें[4] होय[5] । नीवडो[6] नेणे ॥ २१० ॥

नातरि जीवन[1] मीळालें[2] जे रसि । ते[3] नीवडे[4] ना[5] परियसि ।
तेवी[6] ज्ञानीया[7] सौसारेसि[8] । मीळोनी असे ॥ २११ ॥

योगि असे संसारि । परता[1] लींपे[2] क्रीयाव्यापारि ।
पद्मिणिपत्र जळाभीतरि । अलिप्त जैसें ॥ २१२ ॥

अथवा योगि असे संसारि । जेवि परीमळु फुलाभीतरि[1] ।
जैसा[2] वास[3] लोकाचारिं । पवनी[4] मीळे[5] ॥ २१३ ॥

जया[1] पदार्था मीनला । वासु तैसाची आला ।
परि तो नाहि जाहाला । पवन तैसा ॥ २१४ ॥

होमहवन[1] याजीजे[2] । की[3] देवा[4] पीत्रा[5] पुजीजे ।
अग्निमुखि अर्पीजे । तेणें[6] त्रुप्ति सकळ[7] ॥ २१५ ॥

---

२०९. १ (–) ब तं; २ (–) ब तं; ३–४ **स्वरूप जाहालें** ब तं.

२१०. १–२ **अथवा** ब तं; ३–४ **रंगासरिसें** ब तं; ५ **हें** तं; ६ **ते निवडो** ब तं.

२११. १ (–) ब तं; २ **मीळालीयां** ब; ३–५ **तेथोनि निवडो नेणे** ब तं; ६–८ **ते ज्ञानियां संसारेसी** ब; ७–८ **ज्ञानियासी** तं.

२१२. १–२ **परि न लिंपे** ब.

२१३. १ **पुष्पाभीतरी** ब तं; २–३ **वर्तें** ब तं; ४–५ **पवनमेळें** तं, ×× ब.

२१४. १ **जे जे** ब तं.

२१५. १–२ **होमहवनीं येजिजे** ब तं; ३–५ **देवां पितुरां** ब तं; ६ **तरी** ब तं; ७ **सकळां** ब तं.

अैसा तो वैस्वानरु । न करि[1] पापपून्यवीचारु ।
मुखि पडे तीतुका  आहारु । करित असे ॥ २१६ ॥

उत्तम मध्यम पाहि । परि[1] तो न ह्मणेचि कांहिं ।
आनामीकाचा ठाइ । वस्ती जयासि[2] ॥ २१७ ॥

त्यासि काय वीटाळुं[1] जाहाला[2] । कीं अपवीत्र ह्मणउनी[3] वर्जीला[4] ।
तत्वाधिरुप जाहाला[5] । समानचि[6] ॥ २१८ ॥

अग्नि[1] ( न[2] ) म्हणे बोले कोरडे । अथवा बहुत थोडें ।
कुचीळ[3] ना चोखडे । मनी नसे ॥ २१९ ॥

जो अर्पी[1] जेणे[2] कोडें । तो पावे तेणेची पाडें ।
यरु अकल्पित[3] नीवाडे[4] । नीर्वीकल्प ॥ २२० ॥

घटिं चंद्राते देखीलें । जळि प्रतिबींब[1] बीबलें[2] ।
घटाचें मुख बांधलें । तरि[3] काय सांपडला तो ॥ २२१ ॥

मुख दिसे[1] दर्पणि । सत्य की लटिकी[2] भुलवणि ।
जेवी महापुरु दिसे लोचनी । मृगजळाचा ॥ २२२ ॥

सत्य मीथ्य येणें[1] बोलें । लटिके द्वैत प्रतिपादिलें ।
यकचि वांटिलें । दो ठाइ ॥ २२३ ॥

---

२१६. १ **करितां** ब तं.

२१७. १ **नेणे** ब; २ **त्याची** ब, **जयाची** तं.

२१८. १–२ **जाहाला विटाळ** तं; ३–४ **म्हणों येईल** ब तं; ५ (+) **सकळ** तं; ६ **ते तवं मनची** ब, **ते तवं न म्हणेची** तं.

२१९. १ **जेवीं अग्नी** तं, **अग्नी** ब; २ (+) **न** ब तं; ३ **कुश्चीळ** ब तं.

२२०. १–२ **आप जाणें** ब तं; ३–४ **अलिप्त भुवडे** ब तं.

२२१. १–२ **बिंब प्रतिबिंबलें** ब तं; ३ (–) ब तं.

२२२. १ **दिसतसे** ब तं; २ (+) **चि** ब तं.

२२३. १ (+) **चि** ब तं.

यक देखणे दों[1] द्रिष्टि । अथवा दों स्त्रवणि यकचि गोष्टि ।
दों आधराचे संपुष्टि । शब्द यकची[2] ॥ २२४ ॥

की[1] उभय संपुष्टी यक[2] नादु । शीव शक्ति मीळे[3] बींदु ।
घ्राणयुगुळि वेव्रादु[4] । परिमळ जैसा ॥ २२५ ॥

यक चालणे दों पाइं । येक पोहणे दों बाहिं ।
तैसे यकची दीसे दों ठाइं । मुढां जनासि ॥ २२६ ॥

सिव शक्ति हे बोली । द्वैतगुणे[1] वीस्तारलि ।
अैक्यवादा[2] वेगळी । गोष्टि असे ॥ २२७ ॥

भूति[1] आत्मा[2] सकळा[3] । यक[4] देखणे[5] केवळ[6] ।
नाहि दूसरे[7] वेगळें[8] । अश्रीपुरुष[9] ॥ २२८ ॥

पुरुशाचे देहि । आत्मारामु पाहिं ।
अश्रीचे ठाइ । काय आत्मि बोलिजे ॥ २२९ ॥

म्हणउनि हा अनंतु । व्यापुनि बाहि[1] अंतु[2] ।
परिपूर्ण[3] सदोदितु । भुतासहित ॥ २३० ॥

पांचै भुतें वेगळीं । नीभ्रांत नीराळी ।
वस्तु सहज मोकळि । तुज बंध्रन कैंचें ॥ २३१ ॥

---

२२४. १ उभय ब तं; २ येकु ब तं.

२२५. १ कां ब तं; २ (–) ब तं; ३ मिळोनि तं; ४ नानाविधु ब तं.

२२७. १ द्वैतगुणिं ब तं; २ आहिक्यवादाची ब तं.

२२८. १–३ आत्मा येकुचि सकळ ब, भूतमात्रीं सकळां तं; ४–६ कांहीं दुसरे वेगला ब, आत्मा येकुचि रूप केवळा तं; ७–८ विभागु ×× ब; ९ स्त्री ना पुरुष तं, अस्त्रिपुरुषा ब.

२३०. १–२ बाह्याभ्यांतु ब, होये अलिप्तु तं; ३ संपूर्ण तं.

सहज[1] पांचै भुतें । वस्तु सहज[2] मुक्तें ।
कैचे बंधन तुतें । सिंगिजो[3] ॥ २३२ ॥

सहज स्तिति राहासि । जे[1] होइल ते पाहासि ।
कल्पना सांडिसि । तरि वस्तुची तुं ॥ २३३ ॥

स्वप्नी[1] जुझ देखिजे । घायें जेर्जेर होइजे ।
जागृति जाहालिया म्हणीजे । वांचलो कैसा ॥ २३४ ॥

स्वप्नि[1] जाइजे[2] देशांतरा । वरपड होय[3] तस्करा ।
त्याणे[4] हरिला[5] सर्व[6] थारा[7] । जीवीत्वाचा[8] ॥ २३५ ॥

जागृति जाहालिया म्हणे । आहा नागवलों प्राणें[1] ।
तैसे नाथीले[2] जन्ममरण[3] । भय[4] उपजे[5] ॥ २३६ ॥

कापुस कांते कांति । तयाची वस्त्रें होति ।
वीलया[1] गेलीया मागुति । काय जेन्म असे ॥ २३७ ॥

तरि तो कुलाळचि भला । त्याणे[1] घट मृत्तीकेचा केला ।
अग्निमुखि नीपजवीला[2] । पडिला लोकाचारिं ॥ २३८ ॥

त्या मृतिकेचे घटें । सकळहि[1] लोक राहाटे ।
अवचटे[2] जरि[3] फुटे । जतन करितां ॥ २३९ ॥

---

२३२. १ सहसा तं; २ सहीत ब तं; ३ सांगीजो ब, सांगीजे तं.

२३३. १ (–) ब तं.

२३४. १ जेवीं स्वप्नीं ब तं.

२३५. १ अथवा स्वप्नीं ब तं; २ जातां ब तं; ३ होइजे ब तं; ४–७ तेणें हिरतलें संसारा ब तं; ८ जेवीं तयाचे ब तं.

२३६. १ अर्थप्राणें ब तं; २–३ नाथिलिया जन्म मरणें ब तं. ४–५ भीयिजे जेवीं ब, भीजे जेवीं तं.

२३७. १ ते विलयां ब तं.

२३८. १ (–) ब तं; २ निपजला ब तं.

२३९. १ सर्व ब तं; २–३ अवचितचि ब, अवचितां तं.

पांहें पां पुनरावृति । त्या[१] खापराची न्हे माति ।
ते न मीळेच मागुति । भुमीकेसि[२] ॥ २४० ॥

जुगें[१] जाहालीं[२] अपारें । भुमीकेसि[३] न[४] मीळती[५] खापरें ।
मग तुजचि दुसरें । जन्म कैचा[६] ॥ २४१ ॥

जो वीनटला गुरुचरणि । आणि नीवाला ब्रह्मज्ञानी ।
तयासि कैचा परतोनि । जन्मेमृत्य[१] ॥ २४२ ॥

जे नीपजले कुलाळाचे हातिं[१] । त्या खापराचि[२] न्हेची[३] माति[४] ।
मग तुज कैचा मागुति । जन्मेमृत्य ॥ २४३ ॥

पाउस आणि पाणि । दिसती वेगळालि बोलणि ।
तैसें[१] ज्ञानियाचे[२] मनि[३] । यकचि[४] दिसे[५] ॥ २४४ ॥

सागरु आणि सरीता । दीसे वेगळालें बोलता ।
ज्ञानदिष्टि न्याहाळिता । येकची दीसे[१] ॥ २४५ ॥

सुवर्ण आणि आळंकारु । हे[१] शब्दाचे[२] परीकारु[३] ।
ज्ञानीयाचा[४] वीचारु । येकची[५] ते ॥ २४६ ॥

प्रपंच[१] आणि[२] परब्रह्म हे[३] दोन्ही । दीसे वेगळालि बोलणि ।
वीचारितां ज्ञानी । ब्रह्मची सकळहि दीसे[५] ॥ २४७ ॥

---

२४०. १ (–) ब तं; २ **मृत्तिकेसी** ब तं.

२४१. १–२ **आरे युगें गेलीं** ब तं; ३ **परी भूमिकेसि** तं; ४–५ **निमळेती** तं; ६ **कैंचें** ब.

२४२. १ **पुनर्जन्म** ब तं.

२४३. १ **वृत्तीं** ब तं; २–४ **खापरासि नाहीं पुनरावृत्ति** ब तं.

२४४. १–३ **विचारितां ज्ञानी** ब तं; ४–५ **ब्रह्मचि सकळ** ब; ५ **तें** तं.

२४५. १ **ते** ब तं.

२४६. १–३ **शब्दिं द्वैतप्रकारु** ब तं; ४ **ज्ञानदृष्टी** ब तं; ५ **तंव येकचि** ब तं.

२४७. १–२ **तेवीं प्रपंच** ब तं; ३ (—) ब तं; ४–५ **सकळ** ब तं.

जेवी[१] तरंगाकारु । दीसे वेगळा प्रकारु ।
तरंग भंगे[२] वेव्हारु । नीवडेचीना ॥ २४८ ॥

उदकी मीळालें[१] लवण । सांग पां[२] ग्रासिलें कवणें[३] ।
येक गोड[४] यक खारेपण[५] । वेगळे[६] नव्हेची[७] ॥ २४९ ॥

कापुर मिळाला वन्हिसि । नुरेची काजळी[१] नावासि[२] ।
तेवी अमृतनंदा[३] श्रीगुरुसि । ऐक्य[४] जालें ॥ २५० ॥

तव श्रीगुरु म्हणे रे कुमारा[१] । अमृतनंदा योगेश्वरा ।
कवण उपाय[३] तुज[४] पुत्रा[५] । ते[६] सांगिजे मज[८] ॥ २५१ ॥

राउळें[१] मस्तकि[२] ठेवीला हातु । तेणे जाहालो नीश्चय[३] नीभ्रांतु ।
भक्ती नीरामय[४] पंथु[५] । दावीला मज ॥ २५२ ॥

जी मी अनुसरलो भक्ति । तेणे स्फुरलि माझि[१] मति ।
दृढ वीस्वसे[२] गोसावीया[३] प्रति[४] । पावलो मी[५] ॥ २५३ ॥

जी जी माथां ठेवीला करु । ते वेळि वीसरलो[१] तम[२] अहंकारु ।
काम क्रोध मद मछरु । प्रपंचासहित ॥ २५४ ॥

---

२४८. १ (+) वरी ब, उदकीं तं; २ भंगीं ब तं.

२४९. १ मिळे ब; २ (–) ब तं; ३ कवणे कवण ब तं; ४ जल ब तं; ५ क्षारपण ब तं; ६–७ निवडेचिना ब तं.

२५०. १ काजळ ब तं; २ नामासि ब तं; ३ अमृतानंदु ब तं; ४ आईक्य तं.

२५१. १ कुमरा ब तं; २ अमृतानंदा ब तं; ३–४ उपायें रे ब; ३–५ उपायें कुपुत्रा तं; ६–८ तुवां टाकिलें मज ब तं.

२५२. १ हां जि राउळें ब तं; २ माथां ब; ३ निःसंशय ब तं; ४–५ भक्ति विरक्त माया पंथु ब तं.

२५३. १ अद्भुत ब तं; २–४ विश्वासु निवृत्ति ब तं; ५ स्वामी ब तं.

२५४. १–२ दहनिला ब तं.

डंब[1] मोहो प्रति[2] । अहंभावो[3] अहंमति[4] ।
अहंकारु[5] संकल्प[6] स्थिति[7] । हे[8] हरपलि[9] ॥ २५५ ॥

तेथें आशा त्रुष्णा खंडलि । नीद्रा कामना सरलि[1] ।
अहंबुद्धि[2] वीसरलि[3] । ततक्षणि ॥ २५६ ॥

सांडिलें सुखदुःख । नीमालि तान भुक ।
अमृत आणि वीख । समची जालें ॥ २५७ ॥

सारिखा शत्रु मीत्रु । पीता बंधु आणि[1] पुत्रु ।
स्वार्थ संकल्प वीचीत्रु । नीमाला जेथें ॥ २५८ ॥

जेथें हारपलें मी माझें । नीरसलें संसाराचे वोझें ।
सोहंभाव[1] वोझें[2] । अयीचीना ॥ २५९ ॥

ते[1] सांडिलें सिखासुत्र । त्यजीलें[2] कुळगोत्र ।
वीधीकर्म[3] सर्वत्र । ठेलें[4] सहज[5] ॥ २६० ॥

तो कर्मा धर्मासि वेगळा । नातळे दुख[1] दाळिद्र[2] समुळा[3] ।
अभेद देखीला[4] सगळा[5] । आत्माराम[6] ॥ २६१ ॥

अखंड[1] आत्मा[2] अभेदु । देखोनि उपजला बोधू ।
फीटला भेदाभेदु । अद्वैत जाहालें ॥ २६२ ॥

---

२५५. १ डंभु ब; २ तिवरु ब तं; ३–४ अहंबुधी अहंमती अहंकारू ब तं; ५–७ सहजिं सहज स्थिरु ब, ××× तं; ८–९ हारपले तेथें ब तं.

२५६. १ सांडिली ब तं; २ क्षुधातृषा ब तं; ३ दंडिली ब, दडीली तं.

२५८. १ (–) ब तं.

२५९. १–२ सोहंभावें दुजें ब तं.

२६०. १ तहीं ब तं; २ त्यागिलें ब तं; ३ विकर्म ब, कर्म तं; ४–५ ठेविलें सहजी ब तं.

२६१. १–३ सुखदुःख दुकाळा ब तं; ४-६ ×× ब; ५ डोळां ब.

२६२. १–२ ×× ब.

चौऱ्यासि लक्षा भीतरि । उत्तम मनुशजन्म नीर्धारि[1] ।
तो[2] नेणेची[3] आत्मतत्व तरिं । यरझारि न चुकति ॥ २६३ ॥

मनुश्य जन्म पावावें[1] थोरा दैवें । त्यामाजि हरिहरा[2] भजावें ।
अैसे[3] नाठवे[4] तरि भोगावें[5] । योनीजन्म[6] ॥ २६४ ॥

बहुतां कष्टि सायासिं । पुन्य[1] सामग्रि[2] सरसि[3] ।
दुर्छभ मनुश[4] जन्म[5] परीयसि । भजावया[7] हरिहरा[8] ॥ २६५ ॥

मनुश जन्म पावलासि । थोर[1] जन्म लाधलासि ।
त्यामाजि[2] ब्रह्म[3] नेणसि[4] । तरी यरझार न चुके ॥ २६६ ॥

सांडि[1] भ्रांतिभेदु । पंचभुतें[2] आत्मा[3] प्रसिधू ।
सचीदानंद शुद्ध बोध[4] । श्रीगुरु[5] अनंत[6] ॥ २६७ ॥

सांडावा कामक्रोधु । न करावा भूतवीरोधू[1] ।
श्रीगुरुवचनाचा वेधु । असावा मनी ॥ २६८ ॥

तान भूक न म्हणिजे[1] । सित वात न गणिजे ।
गुरुसि[2] शरण[3] रिघीजे[4] । यक[5] तत्वी[6] राहिजे[7] तरि[8] सिध[9] होय[10] ॥ २६९ ॥

---

२६३. १ अवधारीं ब तं; २–३ **तयामाजी नेणसी** ब तं.

२६४. १ (–) ब तं; २ °**हरांतें** ब तं; ३–४ **हें न टके** ब तं; ५ **वोळगावें** ब, **भजावें** तं; ६ **साधुजना** ब, **साधुसंतां** त.

२६५. १–३ ××× ब; ४–६ **पावलासी** ब तं; ७–८ **मनुष्यजन्म** ब तं.

२६६. १ उत्तम ब तं; २–४ **सद्गुरूतें नोळखसी** ब तं.

२६७. १ (+) **सांडी** ब तं; २–३ **पंचभूतात्मा** ब; ४ **बुध्दु** तं; ५–६ **श्री अनंतु हा** तं. ब मध्यें २, ३ व ४ चरण नष्ट आहेत.

२६८. १ **भूतांसि विरोध** ब तं.

२६९. १ **मनिजे** ब; २–४ **गुरुचरणीं विनटीजे** ब तं; ५–१० **भावसहीत** ब, **भावेंसहित** तं.(चालू)

होय श्रीगुरुची कृपा । तरि भवसिंधु तरिजे[1] बापा ।
यरवि[2] बुडे तापा । न[3] पवतां ॥ २७० ॥

गुरुकृपा न्हतां[1] धडपुडि । कैसेनि उतरिजे[2] पैलथडि ।
कैसेन[3] तरति[4] बापुडि । जड जिव ते ॥ २७१ ॥

त्यासि यक असे उपावो । तेहि[1] वोळखावा धर्मदेवो ।
भजोनी[2] भक्तिभावे[3] । सत्व न[4] संडीतां[5] ॥ २७२ ॥

सत्य निर्धारिजे[1] । देवां[2] ब्राह्मणां[3] भजिजे ।
अतित[4] पुजिजे । अर्थरुपें[5] ॥ २७३ ॥

अतित गुण[1] जाणिजे । अतित[2] वोळखिजे ।
भजोनी[3] भजीजे । त्वरित सिधी[4] ॥ २७४ ॥

हे सिधी साधीतां साधकां । वीघ्नें उपजति आइका ।
म्हणोनी शरण रिघिजे देखा । श्रीगुरुराया ॥ २७५ ॥ *

तो काळाय[1] काळु[2] शके । वेळाय[3] वेळु[4] सके[5] ।
आकांति राखो[6] सके[7] । सात्विक भक्ति ॥ २७६ ॥

---

**भावपूर्वक भजीजे । गुरूसि शरण रिघीजे । येकतात्त्विं राहिजे । तरी सिद्धी होये** ॥ ही जास्त ओवी ब तं मध्यें आहे.

**२७०.** १ **उतरिजे** ब तं; २ **येरां धि** ब तं; ३ **थडी न** ब तं.

**२७१.** १ **न पवतां** ब तं; २ **उत्तरतील** ब; ३–४ **बुडिया देतील** ब.

**२७२.** १ **त्याणें** ब तं; २–३ **भेदु सांडूनि भक्तिभावो** ब, **वंदूनि भक्तिभावो** तं; ४–५ **सहित** ब तं.

**२७३.** १ **शरीरीं धरिजे** ब तं; २–३ **देवीं ब्राह्मणी** ब तं; ४ **अतितातें** ब तं; ५ **अतितरूप** ब, **अतीतरूपें** तं.

**२७४.** १ **गुणीं** ब तं; २ (+) **चिन्हीं** ब तं; ३ **वोळखोनि** ब तं; ४ **सिद्धी** ब तं.

**२७५.** * ही ओवी ब तं मध्यें नाहीं.

**२७६.** १ **काळातें** ब तं; २ **अकळु** ब, **कवळु** तं; ३-४ **वेळेतें राखों** ब तं; ५ **निकें** ब; ६–७ **राखोनि कवतुकें** ब.

होय श्रीगुरुसि भेटि । जरि[1] तो नेहाळि कृपादृष्टि ।
तरि तिन्ही लोकिं त्याची गोष्टि । पुरोनी उरे ॥ २७७ ॥

गुरु[1] गौरवें[2] पाहिं । होय[3] यकचि सर्वा ठाइं ।
गुरुकृपा होय काहिं[4] । तन्हिच पावीजे ॥ २७८ ॥

पाववया वस्तु । उपावो असे बहुतु ।
तरि[1] लाभे गुरुचा यकांतु । तरिच सिद्धि ॥ २७९ ॥

जन्मजन्मांतरि सायासिं । बहुतां कष्टि पावलासि[1] ।
येणे जन्में जोडलासि । परब्रह्म रुप[2] ॥ २८० ॥

जो परब्रह्मी लीन जाला । तो भवबंधना[1] अंतरला ।
अभ्यांतरि प्रकाशला । आत्माराम ॥ २८१ ॥

जन्म[1] जाला सोहंबुधि । उन्मनीय[2] तुत्रीशुधि[3] ।
वीसर पडिला वीशयबुधि । राजयोगि ॥ २८२ ॥

तो बोले ना उगला । चेतु ना नीजेला ।
सावधु ना भुलला । राजयोगि ॥ २८३ ॥ *

तो[1] शांत ना क्रूरु । आज्ञान ना मतिसागरु ।
मुर्ख ना चतुरु । राजयोगि ॥ २८४ ॥

---

२७७. १ (–) ब तं.

२७८. १–२ **पुरोनि उरे** ब तं; ३ **असे** ब तं; ४ **पाहीं** ब तं.

२७९. १ **जरी** ब तं.

२८०. १ **प्रयासीं** ब, **सायासीं** तं; २ **स्वरूप** ब तं.

२८१. १ **भवोपाधी** ब तं.

२८२. १ **तन्मयो** ब तं; २–३ **उन्मनी पंथु त्रिशुद्धि** ब तं. ब तं मध्यें चरण २ व ३ यांची अदलाबदल आहे.

२८३. * ही ओवी तं मध्यें नाहीं. ब तं मध्यें २८५, २८३ (–तं), २८६, २८४, २८७ अशा ओव्यांचा अनुक्रम आहे.

२८४. १ **तरी तो** ब तं.

ते[1] तो[2] जिवन[3] ना मृत्यु[4] । जागा ना नीदिस्तु[5] ।
भरते[6] ना[7] उन्मनि भोगीतु । राजयोगी ॥ २८५ ॥

तो शब्द ना नीशब्दु । बाळ ना प्रबुधु ।
तारुण्य[1] ना वृधु । राजयोगी ॥ २८६ ॥

तो[1] त्यागी ना भोगि । गृहे[2] ना वैरागि ।
असोनी[3] जगि । सर्वातितु ॥ २८७ ॥

तो सुखदुःखातितु[1] । पापपुण्यविरहितु ।
जगामाजि विचरतु । अतितरुपें ॥ २८८ ॥

घट उदकिं भरला । आणि उदकामाजि[1] नीक्षेपीला[2] ।
बाह्यअभ्यांतरि[3] दाटला[4] । जेवी जीवने ॥ २८९ ॥

पैं[1] सुताचा गुंडाळा । बाह्यज[2] भीतरि नाहि वेगळा ।
तैसा योगि[3] गमला[4] । बाह्यआंतु[5] ॥ २९० ॥

पैल पवनु पांहें । तो[1] सर्वत्र[2] यकची आहे ।
तो[3] उच[4] नीच[5] म्हणतो[6] काय । सर्वत्र[7] यकची[8] मनी[9] ॥ २९१ ॥

---

२८५. १ (–) तं; २ (–) ब; ३ **जीवंतु** ब तं; ४ **मुकु** ब; ५ **निद्राभूतु** ब तं; ६-७ (–) ब तं.

२८६. १ **तरुण** ब तं.

२८७. १ **तरी तो** ब तं; २ **गृही** ब तं; ३ **असोनिचि** ब तं.

२८८. १ **सुखादुःखा अलिप्तु** तं.

२८९. १ **उदकांचि** ब, **उदकेंचि** तं; २ **स्थापिला** ब तं; ३–४ **तो बाह्य अति कोंदला** ब, **तेहीं बाह्याभ्यंतरीं कोंदला** तं.

२९०. १ **पैलु** ब तं; २ **बाहीजु** तं; ३–४ **राजयोगी संचला** ब, **राजयोगी घेतला** तं; ५ **बाह्यअंतरीं** ब, **बाह्याभ्यंतरीं** तं.

२९१. १–२ **सर्वांत्रि** ब, **सूत्रीं** तं; ३–६ **चोख वोख विचारुनि** ब तं; ७–९ **विचरतु असे** ब तं.

पाहे हे[1] पाहें[2] वसुंदरा[3] । उत्तम[4] मध्यम[5] नीर्धारा[6] ।
सर्वत्र यकची अवधारा । तयाचे वरि ॥ २९२ ॥

पांहें पां वस्तु वीचारि । सर्वत्र यकची निधारिं ।
उत्तम मध्यम अवधारि । तयाचमाजि ॥ २९३ ॥

पाहें पां दिनकर । द्वादशकीर्णि तपे खडतर ।
काय[1] पुण्यपापवीचार[2] । करुनी तपे ॥ २९४ ॥

अग्न[1] समस्ताचे घरिं । तो काय पापपुण्य वीचारि ।
उदक सकळ वेव्हारिं । वर्तत असे ॥ २९५ ॥

वापि कुपी सागरि । अमीत्य[1] सरिताथीलरि ।
काय[2] लहानथोर[3] वीचारि[4] । भानुबींब[5] ॥ २९६ ॥

असें अनंता ठाइं । रवीबींब[1] पाहि ।
जळ आटलिया काइ । बींबनाशु[2] जाला ॥ २९७ ॥

---

२९२–३. १–३ **पां वसुंधरी** ब तं; ४–६ **सर्वत्रिं येकचि निर्धारीं** ब तं.

या ओवीचे शेवटचे दोन चरण व पुढील ओवीचे पहिले चरण गाळून या दोन ओव्यांची ब तं मध्यें एक ओवी केली आहे.

२९४. १–२ **कीं तो पापपुण्यविचार** ब तं.

२९५. १ **अग्नि** ब तं. या ओवींतील २, ३ व ४ चरण ब तं मध्यें पुढील प्रमाणें आहेत :— **उदक सकळ व्यवहारीं । किं तें उत्तम मध्यम विचारी । मग वर्ते ॥**

२९६. १ **बावीं** ब तं; २–४ **काय भानुबिंब विचारी** ब तं; ५ **लहानथोर** ब तं.

२९७. १ (+) **बिंबे** ब तं; २ **बिंबा नाशु** ब तं. यापुढें ब तं मध्यें पुढील ओवी जास्त आहे:—

**कोणे येक मंदिर उभविलें । बाह्य अंतिक आकाश कोंदलें ।**
**मंदिर उभवणिये खचलें । काय व्योमा नाशु जाहाला** ॥ २९७ अ ॥

म्हणोनी परमात्मा यकु । बाह्य अभ्यांतरि व्यापकु ।
पींडब्रह्मांडनायकु । अवेक्तरुप[1] ॥ २९८ ॥

घरा पाहुन[1] आला । बहिर[2] असे[3] बैसला ।
की तो त्याचे नीवेष्टिला । घराश्रमें ॥ २९९ ॥

भुमी चोखट[1] वोखट[2] न म्हणतां[3] । भानु बींबे सर्वगत[4] ।
तैसे याति कुळ न वीचारिता[5] । आत्मा यकरूप ॥ ३०० ॥

मुंगिपासुनी ब्रह्मपर्यंत । आत्मा यकरूप नीभ्रांत ।
प्रकृतिगुणे भीन[1] दीसत[2] । असे[3] तेवी ॥ ३०१ ॥

पाहिं पां माळीयाची करणि । यकची पाणि[1] वाहे[2] सारणि ।
बीजसमंधी वस्त गुणि । विस्तारलि ॥ ३०२ ॥

तैसे देहसमंधे[1] गुण । उत्तममध्यमकनिष्टपण ।
अभिन[2] आत्मतत्व[3] जाण[4] । परमात्मस्वरुप ॥ ३०३ ॥

शरिरसमंधिचे सोयरे । शरीराचेनि[1] आधारें ।
अभीन आत्मतत्व दूसरें । अथीचीना ॥ ३०४ ॥

देहि[1] देहायोगेत[2] । देहिं असोनि अतिते[3] ।
जळामाजी बींबत । चंद्र जैसा ॥ ३०५ ॥

---

२९८. १ अतीतरूप ब, अतीतरूपें तं.

२९९. १ पाहुणा ब तं; २–३ असें घरीं ब तं.

३००. १–२ चोख वोख ब; ३ म्हणे तें ब; ४ सर्वगतें तं; ५ विचारितें तं; ६ येकु ब तं.

३०१. १–२ भिन्नत ब त; ३ दिसे ब तं.

३०२. १–२ उदक वोतिले ब तं.

३०३. १ देहे दग्ध ब तं; २–४ आत्मतत्त्व निर्वाण ब तं.

३०४. १ शरीर ज्याचेनि ब तं; २ आधारे ब.

३०५. १–२ देहीं होये देहगतु ब तं; ३ अतितु ब तं.

युगांताचे सेवटि । उदकमय श्रृष्टि ।
सप्तसागर यकवटि । संपुष्ट[1] जैसें[2] ॥ ३०६ ॥

तैसें परिपुर्ण[1] सदोदित । अलक्ष ब्रह्म नीभ्रांत ।
परमात्मस्वरुप निश्चीतु[2] । अभीन[3] तें ॥ ३०७ ॥

अलक्ष अद्वैत[1] आनंतक[2] । बाह्य अभ्यांतरि व्यापक ।
नी:कर्म नीर्दोशक[3] । परमात्मस्वरुप[4] ॥ ३०८ ॥

ते सुन्य ना शाकार[1] । जंगम ना स्थावर ।
अनंत अगोचर । परब्रह्म[2] ॥ ३०९ ॥

तया आदि ना अंत । बंध[1] ना[2] मुक्त[3] ।
विस्वात्मा अनंत । सोहं सकळ ॥ ३१० ॥

तया आनावसान[1] । आवाहन ना वीसर्जन ।
स्थापना[2] ना पुजन । व्योमातित ॥ ३११ ॥

तैसें[1] सोहंबुधि सकळ । परब्रह्म केवळ ।
अद्वैत नीर्मळ । व्योमातित ॥ ३१२ ॥

---

३०६. १–२ **संपूर्ण जैसी** ब तं. ब तं मध्यें २ व ३ चरणांची अदलाबदल आहे.

३०७. १ **संपूर्ण** ब तं; २ **अनंत** ब तं; ३ **अभिन्न** ब तं.

३०८. १–२ **अनंत अनामिक** ब तं; ३ **निर्दोष परमात्मक** ब तं; ४ **स्वस्वरूप** ब, **स्वरूप** तं.

यापुढें ब मध्यें पुढील ओवी जास्त आहे :

**तें द्वैत ना अद्वैत । सावधान ना भ्रमित ।**
**जागें ना निद्राभुत । तन्मयरूप ॥ ३०८ अ ॥**

३०९. १ **साकार** तं; २ (+) **तें** ब तं.

३१०. १–३ **बंधु ना पुत्रु** तं. ब मध्यें ही ओवी नाहीं.

३११. १ **आदि ना अवसान** ब; २ **स्तवन** ब. तं मध्यें ही ओवी नाहीं.

३१२. १ **ऐसें** तं. ही ओवी ब मध्यें नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 22623 वि: 3104
क्रमांक 7323 नों दि: 517145



तेथें गंध ना पुष्प । धुंप ना दिप ।
जप ना संकल्प । अैसा असे ॥ ३१३ ॥
तेथील लक्षणें[1] सान[2] । समाधि ना साधन ।
सगुण ना नीर्गुण । परब्रह्म तें ॥ ३१४ ॥ *
ते प्राण ना प्रकृति । शिव ना शक्ती ।
प्रळयो ना उत्पति । अवीनाश तें ॥ ३१६ ॥
ते त्रीमीर[1] ना तेज । वृक्ष ना बीज ।
सोहं सकळ नीज[2] । परब्रह्म[3] स्वरुप ॥ ३१७ ॥
अैसे अखंड पुर्णज्ञानी । अद्वैत नीर्वाणि ।
सकळै वीस्व सोहंगुणि । समचि जया ॥ ३१८ ॥
अैसा सहज वस्तुवीस्तारु । जयाचा नीश्चीतु[1] नीर्धारु ।
तया काळ काम नीर्धारु[2] । तृणासमान ॥ ३१९ ॥
तेणें[1] जीतिलें कळिकाळा । भवसागरु लंघिला हेळा ।
आपणची वीस्व होउनी[2] ठेला[3] । अनुंतु[4] हा[5] ॥ ३२० ॥
तयास[1] दृष्ट[2] ब्रह्म । अैसें आंतुडे[3] वर्म ।
बाह्यअभ्यांतरि परब्रह्मी[4] । सदोदितु ॥ ३२१ ॥

---

३१३. ही ओवी तं व ब मध्यें पुढीलप्रमाणें आहे :
**तेथें धुपु ना दिपु । पूजा ना संकल्पु । ध्यान ना जपु । तेथें ऐसे असे ॥**

३१४. १–२ **लये ना लक्षण** ब.

३१७. १ **तिमीर** ब; २ **निर्गुण** ब; ३ **परमात्म** ब. ही ओवी तं मध्यें नाहीं.

३१८. ही व यापुढील ओव्या ब मध्यें नष्ट झाल्या आहेत.

३१९. १ **निश्चित** तं; २ **संसारू** तं.

३२०. १ **तेहीं** तं; २–३ **हें सकळा** तं; ४–५ **होऊनि ठेला** तें.

३२१. १–२ **तया दृश्य सकळ** तं; ३ **आंतुंडलें** तं; ४ **परब्रह्म** तं.

---

* मूळ पोथींत ३१५ व्या ओवीचा अंक नाहीं.

तव श्रीगुरु ह्मणे रे अवधूता । कारण ते बोलिलासि आतां ।
करिं ग्रंथ समाप्त परम भक्ता । अमृतनंदा ॥ ३२२ ॥ *

दृष्टि जाहालि स्थिरु । मना पडिला वीसरु ।
परमात्मा श्रीगुरु । देखिलिया ॥ ३२३ ॥

दृष्टि देखीलया श्रीगुरु । मन जाहालें स्थिरु ।
मावळला अंधकारु । सकळै ब्रह्मची दिसे ॥ ३२४ ॥

गुरुशीश यक जाले । लोकत्रय आनंदलें ।
शीशासि लाधलें । समाधीसुख ॥ ३२५ ॥ §

जाले जन्माचें फळ । पुर्वज उधरले[1] सकळ ।
यात्रा[2] सौसारिची[3] सुफळ । भेटले[4] श्रीगुरु[5] ॥ ३२६ ॥

गुरुसिश्याची[1] अैक्यता[2] । जेवी सागरिं मिळालि सरीता ।
नातरि दीपकर्पुरें[3] वोवाळीता[4] । आत्माराम[5] ॥ ३२७ ॥

गुरुशीश्याचा यकांतु । जेवी आनंदला....नाथु ।
तेवी अमृतनंदा गुरुनाथु । प्रसंन जाहाला ॥ ३२८ ॥ †

---

३२२. * या ओवीचे तं मध्यें २ ते ४ चरण पुढीलप्रमाणें आहेत :— **अमृतानंदा परमभक्ता । कारण बोठिलासी तत्त्वता । करी ग्रंथु समाप्ती ॥**

३२३–४. या ओवींबद्दल तं मध्यें अशी ओवी आहे :— **दृष्टी देखी श्रीगुरु । मन जालें स्थीरु । पणा पडिला विसरु । परमात्मा श्रीगुरु देखिल्यां ॥**

३२५. § या ओवीचे ३ व ४ चरण तं मध्यें असे आहेत :—**तेथें ब्रह्मरूप सगळें । वेद नेणती ॥**

३२६. १ **उत्धरिलें** तं; २–३ **संसारयात्रा** तं; ४–५ **गुरुचे भेटी** तं.

३२७. १–२ **गुरुशिष्य कथा ऐकतां** तं; ३–४ **दीप कर्पुरे उजाळितां** तं; ५ **वोवाळिजे आत्मारामु** तं.

३२८. † या ओवीचे २ ते ४ चरण तं मध्यें असे आहेत : **जो अनुवादला श्री दत्तु । ते अमृतानंद सांगतु । । योगराजटिळकु ॥**

ग्रंथ सिधी[1] पावला । श्रीगुरु सुखीया जाला ।
आपल्या[2] पदिं[3] बैसवीला[4] । प्रेम[5] दिधलें[6] भक्तीसि ॥३२९॥

जे हा ग्रंथ अभ्यासिति । तया प्राणिया होय मुक्ति ।
जे सात्त्विकपणें अैकति । तया होय ज्ञानमति ॥ ३३० ॥*

इति श्रीयोगराजटिळक ग्रंथ समाप्त ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९८

भग्नपुष्टिकटिग्रीवास्तद्धपुष्टिरधोमुख ॥
अबधो वा सुबधो वा मम दोश न विद्यते ॥
श्वति श्रीनृपशालिवाहान शके १६३० विरोधीनाम सवत्सरे आशाढ वद नवमी भोमवासेरे तददिनी ग्रंथ समाप्त ॥ आपाजीसुत दत्तात्रीना लीख्यते वास्तवापाराशर्य ॥ ॐ ॥ इति श्रीयोगराजटिळक ग्रंथ संपूर्णमस्तु ॥ स्वस्ती श्रीनृपशालिवाहान शके १६३० विरोधि नाम सवत्सरे आशाढ वद नवमी भोमवासेरे ॥ तददिनी ग्रंथ समाप्त ॥

॥ यादृषि पुस्तकं दृष्ट्वा तादृषि लिखित मया ।
अबोध वा सुबध वा मम दोशो न विद्यते ॥ १ ॥

भग्न पुष्टि कटिग्रिवास्तब्धपुष्टिरधोमुखं ॥
क्लेशेन लिहित ग्रंथ यत्नेन प्रतिपालयत् ॥ २ ॥
दतो आपाजीने लीख्यते ॥ ॐ ॥

---

३२९. १ सित्ध तं; २–४ प्रेम देऊनि आपुलां तं; ५–७ पदीं बैसविला तं.

३३०. * या पुढें तं मध्यें पुढील मजकूर आहे :

**इती श्रीयोगराजुटिळकु समाप्त ॥ तत्सत्ब्रह्मार्पणमस्तु ॥ स्वहस्तलिखित ॥ ह्मइपसेट नाम वंशीं घोडका ॥ ग्रंथु समाप्तु जाहाला ॥**

८७९९

**कांहीं नवी माहिती** :–रोमहून Fr. J. Wicki हे, अलिकडे त्यांच्याकडून आलेल्या पत्रांत, 'योगराजटिळक' या ग्रंथाच्या पोर्तुगीज भाषांतराचा कर्ता Manoel de Oliveira असें कळवितात; पण हा त्यांचाही तर्कच असावा. मानुएल द ओलिव्हैर याचा निर्देश आम्हीं या काव्याच्या 'प्रास्ताविक' मजकुरांत केलाच आहे. (पृ. ४) याच्यासंबंधीं कांहीं माहिती गोवाकॉलेजांतून Luis Frois यानें ता. १४ नवंबर १५५९ रोजीं लिहिलेल्या एका पत्रांत सांपडते. तिचा सारांश असा :

गोवा बेटामधील ब्राह्मणांमध्यें सर्वांत बुद्धिमान व हिंदुधर्मशास्त्रपारंगत असा एक तरुण होता. त्याच्या अंगच्या गुणांवर लुब्ध होऊन अनेक पाद्रींनीं त्याला क्रिस्ती धर्म स्वीकारण्याबद्दल गळ घातली. त्यानें जवळजवळ तसें वचनही दिलें होतें. त्याचा बाप, आई व तीनचार बंधु हे बातिस्मा घेत असतां तो गोव्यामधून एकाएकी अदृश्य होऊन पोर्तुगीज सत्तेबाहेरच्या मुलुखांत गेला; परंतु त्याचीं मातापितरें क्रिस्ती झाल्यावर "आमच्या प्रभूच्या प्रेरणेनें" तो स्वतःच या कॉलेजांत आला. हा साऱ्या ब्राह्मणांचा केवळ 'नेत्र'च होता व सर्वांची त्यावर भारी मदार होती.

अशा व्यक्तीसारख्यांच्या महत्त्वाच्या बातिस्म्याच्या प्रसंगीं स्वतः व्हाईसराय धर्मपिता होतो; परंतु त्याच्या इच्छेवरून हा क्रिस्तीकरणसमारंभ गाजावाजा न करतां गुपचुपपणें पार पाडण्यांत आला. पुढें त्याला मानुएल द ओलिव्हैर असें नांव मिळालें. क्रिस्ती धर्माची त्यानें स्वतःच छापील पुस्तकांवरून माहिती करून घेतली. शिवाय Francisco Roiz (याचा उल्लेख मागें आलाच आहे) हा त्याला दर दिवशीं क्रिस्ती धर्मानुसार जगदुत्पत्ति, मोक्ष वगैरे संबंधींची माहिती देत असे व त्यांच्या धर्मविषयक शंकांचें निवारण करीत असे.

शेजारच्या परमुलुखांतील एका विद्वानाजवळ व्यासाचीं अठरादश पुराणें वगैरे हिंदु ग्रंथ आहेत, हें त्याला माहीत होतें. व्हाईसरायाची परवानगी घेऊन तिघां साक्षीदारांसह तो त्याच्या घरीं गेला व त्याला जागा नक्की माहीत असल्यामुळें तें ग्रंथभांडार त्यानें रात्रीच्या वेळीं पळवून मोठ्या उत्साहानें गोव्याच्या कॉलेजांत आणलें. कारण ब्राह्मणांशीं वादविवाद करून हिंदुधर्माचें खंडन करण्यास या ग्रंथांचा मोठा उपयोग होता. यापैकीं महत्त्वाच्या ग्रंथांचें भाषांतर करण्यांत त्यानें कांहीं दिवस घालविले व हीं पोर्तुगीज भाषांतरें सेंट फ्रान्सिस्कानंतर इतर पाद्रींनीं सीलोन वगैरे भागांतील ब्राह्मणांशीं वादविवाद करण्यास बरोबर नेलीं. (*Documentacao para a Historia das Missoes do Padroado Portuguez do Oriente*–A. da Silva Rego, 7 Vol. Lisboa 1952. pp. 344–5.)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २२६९३ ..... दि: ३/८/८४
REFBK-0009099
REFBK-0009099